| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ३ रा | शुक्रवार, दिनांक १३ मार्च २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# महाराष्ट्रावर दुहेरी संकट; एकीकडे उष्णतेची लाट तर दुसरीकडे अवकाळी पाऊस झोडपणार

**नागपूर /प्रतिनिधी :** विदर्भात पुढील दोन दिवस उष्णतेची लाट कायम राहणार असून त्यानंतर अवकाळी पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. काही जिल्ह्यांमध्ये तापमान ४० अंशांच्या पुढे गेल्याने नागरिकांनी सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विशेषतः अमरावती, वर्धा आणि अकोला जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला असून उष्णतेची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे. उत्तर-पश्चिमेकडून वाहणाऱ्या उष्ण वाऱ्यांमुळे तापमानात वाढ होत असल्याचे हवामान तज्ज्ञांनी सांगितले.

दरम्यान, १४ आणि १५ मार्चदरम्यान विदर्भात मेघगर्जनेसह अवकाळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. उष्णतेची लाट आणि त्यानंतर अचानक पावसाची शक्यता यामुळे हवामानात मोठे चढउतार दिसून येत आहेत. राज्याच्या इतर भागातही हवामानात बदल होत असून काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी वारे वाहण्याची शक्यता आहे. हवामान तज्ज्ञ कृष्णानंद होसाळीकर यांच्या माहितीनुसार, १३ ते १६ मार्चदरम्यान मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांत मेघगर्जनेसह पाऊस पडू



शकतो. तर मुंबई येथे उष्णतेचा तडाखा काहीसा कमी झाला असून गुरुवारी कमाल तापमान ३३ अंशांवर नोंदवले गेले. मात्र राज्यातील अनेक भागांत उष्णतेचा प्रभाव कायम आहे. १५ ते १६ मार्च दरम्यान विदर्भासह मराठवाडा तसेच धुळे, जळगाव, नाशिक, पुणे, अहिल्यानगर, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर या जिल्ह्यांमध्ये ढगाळ वातावरणासह तुरळक पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

कडक उन्हाचे चटके वाढत असल्याने नागरिकांनी दुपारच्या वेळी बाहेर पडणे टाळावे, पुरेसे पाणी पिणे आणि उष्माघातापासून बचाव करण्यासाठी आवश्यक काळजी घ्यावी, असे आवाहन हवामान विभागाने केले आहे. मार्च महिन्याच्या सुरुवातीपासूनच महाराष्ट्रात उन्हाचा तडाखा वाढला असताना, आता राज्यावर पावसाचे सावट निर्माण झाले आहे. आज, १३ मार्च २०२६ रोजी राज्यात हवामान प्रामुख्याने उष्ण आणि कोरडे राहणार असले, तरी विदर्भ आणि मराठवाड्यात उष्णतेच्या लाटेसोबतच वादळी वाऱ्यासह पावसाचा 'डबल अटॅक' होण्याची शक्यता आहे.

उत्तर कोकणात पुन्हा एकदा उष्णतेची लाट येण्याचे संकेत आहेत. मुंबई, ठाणे, रायगड आणि पालघर जिल्ह्यांमध्ये पुढील ४८ तास प्रचंड उकाडा आणि दमट हवामान असेल. हवामान विभागाने या भागासाठी 'यलो अलर्ट' जारी केला असून कमाल तापमान ३९ अंश सेल्सिअसपर्यंत जाण्याची शक्यता आहे. छत्रपती संभाजीनगरसह संपूर्ण मराठवाड्यात सध्या तापमानाचा पारा वाढलेला आहे. आज दिवसभर उष्ण हवामान असेल, मात्र पुढील २४ तासांत वातावरणात मोठा बदल होणार आहे. वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाची शक्यता असल्याने विभागात यलो अलर्ट देण्यात आला आहे.

विदर्भात सध्या सर्वाधिक संकट जाणवत आहे. मार्चच्या सुरुवातीपासूनच पारा ४० अंशांच्या आसपास असताना आता अवकाळी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यांना आज पावसाचा इशारा असून, शनिवारपासून संपूर्ण विदर्भात पावसाची हजेरी लागण्याची शक्यता आहे.

### १७ ते २० मार्च दरम्यान राज्यात मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता

१७ ते २० मार्च दरम्यान राज्यातील काही भागांमध्ये प्रामुख्याने दुपारनंतर आभाळी हवामान तयार होऊन मेघगर्जनेसह पाऊस आणि वादळी वाऱ्यांची स्थिती निर्माण होण्याचा प्राथमिक अंदाज आहे. सध्याच्या अंदाजानुसार ही स्थिती प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, खानदेश तसेच मध्य महाराष्ट्रातील भागांमध्ये दिसून येऊ शकते. या दरम्यान विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही प्रमाणात गारपिटीची शक्यता देखील नाकारता येत नाही. सध्याच्या अंदाजानुसार १८ ते २० मार्च दरम्यान या हवामान घडामोडींची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे.

# ..तर महिलांना कुणीही कामावर ठेवणार नाही

## मासिक पाळीच्या काळात सुट्टीची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने का फेटाळली?

**नवी दिल्ली/वृत्तसेवा :** मासिक पाळीशी संबंधित शारीरिक त्रासाचा विचार करून महिला कर्मचाऱ्यांना 'पेड पिरियड लीव' (Paid Menstrual Leave Policy) (पगारी रजा) देण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने ऐकण्यास नकार दिला आहे. आज (शुक्रवार, १३ मार्च २०२६ रोजी) झालेल्या सुनावणीत न्यायालयाने अत्यंत महत्त्वाची निरीक्षणे नोंदवली आहेत.

मुख्य न्यायाधीश सूर्यकांत आणि जस्टिस जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी पार पडली. यावेळी सीजेआय सूर्यकांत म्हणाले, महिलांना इतके (Paid Menstrual Leave Policy) कमकुवत समजू नका. तुमची ही मागणी ऐकायला जरी योग्य वाटत असली, तरी ती अंतिमत: महिलांचे नुकसानच करणारी ठरेल. जर पगारी रजा अनिवार्य केली, तर कंपन्या महिलांना नोकरी देण्यास विचार करतील. अशा याचिकांमुळे महिलांच्या कार्यक्षमतेवर नकारात्मक परिणाम होतो आणि कामाच्या ठिकाणी त्यांच्या प्रगतीमध्ये अडथळे निर्माण होतात, असेही न्यायालयाने या याचिकेबाबत बोलताना स्पष्ट केले आहे..याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील एम. आर. शमशाद यांनी युक्तिवाद केला की, केरळ सरकारने शाळांमध्ये अशी व्यवस्था लागू केली आहे आणि अनेक खासगी कंपन्या स्वतःहून अशा रजा देत आहेत. त्यावर न्यायालयाने उत्तर दिले की, जर एखादी कंपनी स्वेच्छेने रजा देत असेल तर ती चांगली गोष्ट आहे. परंतु, जर आम्ही कायद्याने याची सक्ती केली, तर न्यायव्यवस्था किंवा सरकारी नोकऱ्यांमध्येही महिलांना प्राधान्य दिले जाणार नाही. यामुळे महिलांचे करिअर संपुष्टात येऊ शकते.. सुनावणीदरम्यान जस्टिस जॉयमाल्या बागची यांनी नमूद केले की, ही संकल्पना चांगली असली तरी ज्यांना पगारी रजा द्यायची आहे, त्या नियोक्त्यांच्या मानसिकतेचाही विचार करणे आवश्यक आहे. न्यायालयाने म्हटले की, याचिकाकर्त्याने आधीच सरकारला या संदर्भात निवेदन दिले आहे. आता केंद्र आणि संबंधित राज्य सरकारांनी सर्व भागधारकांशी चर्चा करून यावर धोरण ठरवावे. दन्यायालयाने या याचिकेबाबत बोलताना म्हटलं की, मासिक पाळी ही काही 'वाईट घटना' नाही. अशा मागण्यांमुळे समाजात असा संदेश जातो की महिला कमकुवत आहेत, जे चुकीचे आहे. सरकार यावर चर्चा करून योग्य निर्णय घेऊ शकते, परंतु न्यायालय यात सक्तीचे आदेश देऊ शकत नाही असंही न्यायालयाने स्पष्ट केलं आहे.

### नळेगाव महसूल मंडळात शनिवारी समाधान शिबीर

**नळेगाव/ अजगर मजकुरी :** राज्य शासनाच्या महसूल विभागाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची दखल घेत त्यांच्या नावे महाराजस्व समाधान शिबीर अभियान राबविण्याचा निर्णय घेतला. शनिवारी (दि. १४) ग्रामपंचायत सभागृहात शिबीर पार पडणार आहे. शिबिरात प्रलंबित फेरफार निकाली काढणे, उत्पन्न, रहिवासी, जात, नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्रे वाटप करणे, सामाजिक अर्थसहाय्य अंतर्गत मंजुरी आदेश वाटप, तुकडेबंदी कायद्याच्या उल्लंघनाबाबतच्या प्रकरणाचा निपटारा, सात-बारा वाटप, भूसंपादन व अकृषीक परवानगी प्रकरण, गाव दप्तर अद्ययावतीकरण, कृषी विभाग, संगांयो विभाग, आधार कार्ड विभाग, पुरवठा विभाग, निवडणूक विभाग, भूमिअभिलेख विभागांसह संलग्न गावगाड्यातील प्रकरणं एकाच छताखाली ताबडतोब निकाली काढण्यासाठी शिबीर आयोजित केले आहे.

# दोन कारच्या ओव्हरटेकच्या स्पर्धेत दुचाकीस्वाराचा नाहक मृत्यू!

**जळकोट/प्रतिनिधी :** धडक दिलेली कार व थार गाडी यांच्यात ओव्हरटेक करण्याची स्पर्धा सुरू होती. या स्पर्धेच्या नादात धडक लागून दुचाकीस्वाराचा नाहक मृत्यू झाला आहे. राष्ट्रीय महामार्गावर सतत होणारे अपघात व त्यातून होणारी जीवितहानी हा एक चिंतेचा विषय बनत चालला आहे.

घोणसी (ता. जळकोट) येथील साईनाथ जयराम जानतिने (३५) हे घोणसी येथून दुचाकीने जळकोटकडे येत होते. तर एक कार जळकोटकडून उदगीरच्या दिशेने जात होती. ही दोन्ही वाहने राष्ट्रीय महामार्गावरील पाटोदा खुर्दजवळ येताच त्यांची आमनेसामने जोरदार धडक झाली. धडक एवढी जबरदस्त होती दुचाकीस्वार साईनाथ जानतिने हे आकाशात काही फूट उंच उडाले व दो-नशे फूट दूर फेकल्या गेले. तसेच रस्त्याच्या बाजूला असलेल्या खड्यात जाऊन पडले, असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. खाली पडल्यानंतर जागेवरच त्यांचा मृत्यू झाला.

मृत तरुण एका खासगी कंपनीत नोकरीला आहे. तो कामावर जळकोटला



येत असताना हा अपघात झाला. या धडकेने कारच्या समोरचा भागही चेंदामेंदा झाला आहे. मृत साईनाथ जानतिने यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, मुलगा, बहीण, भाऊ व आई-वडील असा परिवार आहे. या घटनेमुळे परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे. अपघातग्रस्त व्यक्तीचा मृतदेह ग्रामीण रुग्णालय, जळकोट येथे उत्तरीय तपासणीसाठी आणण्यात आला आहे.

# बस स्थानकात डिझेल भरताना एसटीला भीषण आग




**निलंगा /प्रतिनिधी :** बस स्थानकात गुरूवारी सायंकाळी ८ वाजता डिझेल भरत असताना एसटी बसला अचानक भीषण आग लागल्याची धक्कादायक घटना घडली. या आगीत डिझेल भरणारे ऑपरेटर बसवराज मठपती हे गंभीररित्या भाजले असून, आगीच्या भक्ष्यस्थानी पडलेली बस पूर्णपणे जळून खाक झाली आहे. सुदैवाने, अग्निशामक दलाने वेळेवर धाव घेतल्याने डिझेल पंपाचा मोठा अनर्थ टळला.

मिळालेल्या माहितीनुसार, निलंगा बस स्थानकातील पंपावर एसटी बसमध्ये डिझेल भरण्याचे काम सुरू होते. यावेळी अचानक ठिणगी पडून आगीचा भडका उडाला. काही क्षणातच आगीने रौद्र रूप धारण केले. डिझेल भरणारे ऑपरेटर बसवराज मठपती हे आगीच्या विळख्यात सापडल्याने गंभीर भाजले आहेत. त्यांना तात्काळ निलंगा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच निलंगा नगरपालिकेचे नगरसेवक ईश्वर पाटील यांनी तात्काळ अग्निशामक दलाला पाचारण केले. घटनास्थळी डिझेलचा मोठा साठा असल्याने आग पसरली असती तर भीषण स्फोट होण्याची शक्यता होती. मात्र, अग्निशामक दलाच्या जवानांनी जीवाची बाजी लावून आगीवर नियंत्रण मिळवले आणि डिझेल टाकीपर्यंत आग पोहोचण्यापूर्वीच ती विझवली. या भीषण आगीत एसटी बसचा केवळ सांगाडा शिल्लक राहिला असून महामंडळाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. आग लागल्याचे समजताच परिसरात बघ्यांची मोठी गर्दी जमली होती, ज्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. प्रशासनाकडून आता या आगीच्या नेमक्या कारणांचा शोध घेतला जात आहे.

### कर्मचारी बसूआप्पा मठपती यांचा दुर्दैवी अंत



निलंगा बस आगारातील कर्मचारी बसूआप्पा मठपती हे आपल्या सेवेतून अवघ्या दोन महिन्यातच सेवानिवृत्त होणार होते परंतु बस मध्ये डिझेल भरताना झालेल्या दुर्दैवी घटनेमुळे अवघ्या दोन महिन्यावर सेवानिवृत्त होणार त्यातच त्यांचा मृत्यू झाल्याने निलंगा बस आगारातील सर्व कर्मचाऱ्यासह तालुका भरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

### प्रभात किरणे

वर्तन चारित्र जिथे
जिथे तोच देव,वसे
तिथे तिथे सौंदर्य,धन
काय कामाचे कर्माविना
नष्ट होऊन जायचे
- इंजि. नागनाथ कलवले

# गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी अन्न, नागरी पुरवठा विभागामार्फत राज्यभर नियंत्रण कक्ष; जिल्हास्तरीय समित्या स्थापन

## गेल्या सहा महिन्याच्या तुलनेत अधिक प्रमाणात घरगुती गॅस सिलेंडर उपलब्ध

- अत्यावश्यक सेवांना एलपीजी पुरवठा प्राधान्याने
- राज्यात घरगुती एलपीजीचा तुटवडा नाही
- समाजमाध्यमांवरील खोट्या/बनावट बातम्यांवर कारवाई
- अफवांवर विश्वास न ठेवण्याचे नागरिकांना आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी :** इराण - इस्राईल युध्दाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या घरगुती व व्यावसायिक वापराच्या गॅस सिलेंडर सुरळीत पुरवठयाबाबत राज्य शासन विविध उपाययोजना राबवत आहे. घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

संपूर्ण राज्यामध्ये एलपीजी सुरळीत ठेवण्याविषयी तसेच पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी दिले आहेत.

घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत होत राहील, याची नागरिकांनी निश्चिंतता बाळगावी, अशी ग्वाही अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे. मार्च महिन्यामध्ये गेल्या सहा महिन्याच्या तुलनेत अधिक प्रमाणात घरगुती गॅस सिलेंडर उपलब्ध असून युध्दाच्या पार्श्वभूमीवर घरगुती गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत राहील याची खबरदारी घेण्याच्या सूचना विभागामार्फत सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत.

जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा पुरवठा अधिकारी आणि सर्व सरकारी गॅस कंपन्यांचे अधिकारी यांचा या समित्यांमध्ये समावेश असेल. गॅस पुरवठा साखळीवर देखरेख ठेवणे, कायदा व सुव्यवस्था राखणे तसेच दररोज परिस्थितीचा आढावा घेऊन अहवाल सादर करणे ही समित्यांची प्रमुख जबाबदारी असेल.

मुंबई-ठाणे रेशनिंग क्षेत्रात नियंत्रक, रेशनिंग यांच्या नियंत्रणाखाली स्थापन केलेल्या समितीत पोलीस उप आयुक्त आणि उपनियंत्रक (रेशनिंग) समितीत समावेश करण्यात येणार असून मुंबई आणि ठाणे शहरातील सर्व उपायुक्तांशी सह पोलीस आयुक्त (प्रशासन) समन्वय साधणार आहेत. पर्यायी इंधनाच्या वापराची शक्यता तपासण्याचे निर्देशही यंत्रणांना देण्यात आले आहेत. यामध्ये कोळसा, रॉकेल आदी पर्यायांचा विचार केला जाणार असला तरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक राहणार आहे. तसेच जिल्हास्तरीय समित्यांनी हॉटेल व रेस्टॉरंट संघटनांसोबत बैठक घेऊन पर्यायी इंधनाच्या वापरासाठी प्रोत्साहन देण्याचे निर्देश दिले आहेत.

अत्यावश्यक सेवांना एलपीजी पुरवठा प्राधान्याने रुग्णालये, शासकीय वसतिगृहे, शासकीय शाळा/महाविद्यालयांमधील मेस, मध्यान्ह भोजन योजना, शासकीय आश्रमशाळा आदी अत्यावश्यक सेवा देणाऱ्या संस्थांना घरगुती/व्यावसायिक गॅसचा पुरवठा प्राधान्याने देण्यात येणार असून अशा संस्थांची यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे. अत्यावश्यक सेवांना एलपीजी पुरवठा प्राधान्याने देण्यासाठी स्वतंत्र प्राधान्यक्रमही निश्चित केला जाणार आहे.

गॅस पुरवठ्याबाबत अफवा पसरू नयेत, यासाठी दररोज रेडिओ, एफएम, दूरदर्शन तसेच मुद्रित माध्यमांद्वारे माहिती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि जिल्हा समित्या यांसंदर्भातील जबाबदारी पार पाडतील समाज माध्यमांवरील खोट्या/बनावट बातम्यांवरही कारवाई करण्यात येणार आहे.

गॅस बुकींग ॲप आणि मिस्ड कॉल सेवांमध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणी तातडीने दूर करण्याचे निर्देश तेल कंपन्यांना देण्यात आले आहेत. तसेच राज्य, विभाग, जिल्हा आणि तालुका स्तरावर नियंत्रण कक्ष तातडीने सुरू करून तक्रार निवारणासाठी व्हॉट्सॲप सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.




आगामी धार्मिक सण व उत्सवांचा विचार करून सार्वजनिक संस्थांना एलपीजी सिलिंडरचा पुरवठा अखंड ठेवण्यासाठी प्राधान्य राहील. गॅस सिलिंडर पुरवठ्या संदर्भात नागरिकांमध्ये घबराट निर्माण होऊ नये, यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ग्रामपंचायत सदस्यांची मदत घेण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. एलपीजी वाहतूक करणाऱ्या वाहनांना तसेच गॅस एजन्सींना आवश्यक पोलीस संरक्षण देण्याची जबाबदारी पोलिस प्रशासनावर सोपविण्यात आली आहे.

जिल्हा प्रशासन, रेशनिंग नियंत्रक आणि तेल कंपन्यांनी दररोज साठा स्थिती व अद्ययावत अहवाल राज्यस्तरीय नियंत्रण कक्षाला सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

राज्यात घरगुती एलपीजीचा तुटवडा नाही महाराष्ट्र राज्यात दररोज सरासरी सुमारे ९,००० मेट्रिक टन एलपीजी ची मागणी असते. ही मागणी पूर्ण करण्यासाठी रिफायनरीमधील एलपीजी उत्पादन वाढविण्यात आले असून, गेल्या दोन दिवसांत दैनिक उत्पादन ९,००० मेट्रिक टनांवरून ११,००० मेट्रिक टनांपर्यंत वाढविण्यात आले आहे. त्यामुळे राज्यात घरगुती एलपीजीचा कोणताही तुटवडा नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. घरगुती गॅसची मागणी पूर्ण करण्याइतके पुरेसे उत्पादन आणि साठा उपलब्ध आहे.

व्यावसायिक एलपीजीच्या बाबतीत केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्राधान्यक्रम निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार रुग्णालये, शाळांमधील मध्यान्ह भोजन योजना, शासकीय आश्रमशाळा, सामुदायिक स्वयंपाकगृहे (कम्युनिटी किचन), तसेच शासकीय शाळा व महाविद्यालयांच्या मेस यांसारख्या अत्यावश्यक सेवांना प्राधान्य देण्यात येत आहे. उपलब्ध उत्पादनातून या सर्व गरजा पूर्ण होऊ शकतात.

घरगुती वापरासाठीच्या पाइप्ड नॅचरल गॅस (पीएनजी) चा देखील पुरेसा साठा उपलब्ध आहे. इंधनाच्या बाबतीतही राज्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. बाजारातील मागणी पूर्ण करण्यासाठी राज्यातील रिफायनरी पूर्ण क्षमतेने कार्यरत असून दररोज सुमारे १५,००० किलो लिटर पेट्रोल आणि ३८,००० किलो लिटर डिझेल या मागणीची पूर्तता केली जात आहे. त्यामुळे इंधन पुरवठ्याबाबत नागरिकांनी काळजी करू नये असे आवाहन विभागामार्फत करण्यात आले आहे.

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



महाराष्ट्रात गॅस टंचाई!
ग्रामीण भागात ४५
व शहरी भागात ४५
दिवसांना गॅस मिळणार

### चिमटा दयाचा



लातूर प्रशासन
अतिक्रमण हटवेल !
मात्र परत होणार नाही
याची खात्री काय !!

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

# गॅस सिलेंडरवरून गोंधळ

अमेरिका-ईस्त्राईल मिळून इराणवर हल्ला केला, त्याचे पडसाद जगात उमटत आहेत. त्यात इंधनाचा तुटवडा थोड्याफार प्रमाणात जानवत आहे. घरगुती स्वयंपाकाच्या गॅस बाबत सरकारने काळजी घेतली आहे. कमर्शियला गॅस सिलेंडरचा पुरवठा थांबविला आहे. जनतेला घरगुती स्वयंपाकाचा गॅस सिलेंडरची आडचण येवू नये यासाठी सरकार प्रयत्नात आहे. असे असताना विरोधक या बाबत राजकारण करीत आहेत. जसे मोठे संकट कोसळले आहे. स्वयंपाकाचा गॅस हा आवश्यक आहे. तो सर्वांना लागतो, यात शंका नाही. अजून तरी गॅस सिलेंडर नसल्याने उपाशी राहीला असे घडले नाही. अर्थशास्त्रात मागणीचा सिद्धांतचा विचार केला तर मागणी वाढली की, तुटवडा जाणवतो. वास्तविक मिळणार नाही अशी भिती मनात निर्माण झाल्याने ग्राहक एक नाही दोन-दोन सिलेंडर साठा असावेत या विचारात आहेत. काही साठेबाजी करतात तर काही आपला स्वार्थ साधतात. तसेच संकट काळाचा लाभ घेतात. संकटाचे देणे-घेणे नसते. केवळ आपला स्वार्थ साधला जातो. खरे संकट इराणच्या जनतेवर आहे. बारा दिवस झाले तरी ते संकटावर मात करीत आहेत. अमेरिकेसारख्याला घाबरत नाहीत. मोठ्या हिंमतीने इराणी जनता मुकाबला करीत आहे. भारतात मात्र स्वयंपाकाचा गॅस सिलेंडर मिळेल का नाही. युद्ध समाप्त झाले नाही तर स्वयंपाकाच्या गॅस सिलेंडरचे काय होणार याच चिंतेत आहेत. पुर्वी विशेष करून ग्रामीण भागात गॅसच्या टाक्या होत्या का? गॅस सिलेंडर मिळाले नाही तर उपाशी कोणीही राहणार नाही. आलिकडे एवढे पर्याय आहेत की, मार्ग आहेत. इलेक्ट्रिकचा वापर होतो. सुर्यचुली आहेत. अनेक उपाय आहेत तरी चर्चा मात्र गॅस सिलेंडर मिळेल का नाही याचीच होताना दिसून येत आहे. मुळात आपल्या देशाचे पंतप्रधान यांनी उपायोजना सुरु केली आहे. ईतर देशातून गॅसचे जहाज मागविले आहेत. सरकार काही या बाबतीत गाफील नाही. काही तरी उपायोजना निश्चित करेल. नागरिकांनी चिंता करू नये. विरोधकांना तर राजकारण करावयाचे आहे असेच चित्र दिसून येत आहे. मुळात भारताने काही उपायोजना केल्याचे सांगत आहेत. उपायोजना म्हणून व्यावसायिक गॅस वितरण थांबविले आहे. आज जनसामान्यांना गॅस सिलेंडर मिळावे या बाबत जिल्हास्तरावर प्रयत्न सुरु आहेत. प्रशासन या बाबत सतर्क झाले आहे. तरी जनता चिंतेत दिसून येत आहे. आज चिंता आहे ती म्हणजे अमेरिकेला परमेश्वर सुबुद्धी देवो. त्यांना युद्ध थांबविण्याची बुद्धी देवो. जर युद्ध थांबले तर जगात चिंता व्यक्त केली जात आहे ती दूर होणार आहे. युद्ध इस्त्राईल -इराण दरम्यान होत असले तरी त्याचे पडसाद जगभर उमटले जात आहेत. इराण हा इंधन पुरविणारा देश आहे. जगात इंधनाचा तुटवडा जाणवत आहे. केवळ भारताला झळ पोंहचत नाही असे नाही तर जगाला झळ पोंहचत आहे. त्यामुळे भारतीयांनी अधिक चिंता करणे योग्य नाही. गॅसटंचाईचे कारण राजकारण करताना दिसून येत आहे. त्यामुळे सर्वांना सामांजस्यांनी भुमिका घेतली पाहिजे. युद्ध म्हटले की, दोघाकडून मारा होत असतो. इराण सुद्धा ड्रोनद्वारे प्रतिहल्ला करीत आहे. इंधनावर म्हणजे खणीज संपत्तीवर मोठे झालेले लहान देश आहेत. त्याच प्रमाणे युद्धासाठी स्वयंपूर्ण आहेत. त्यांच्याकडे तगडे असे शस्त्र आहेत. मिसाईल आहेत. त्यामुळे इराण घाबरेल असे ट्रम्प यांना वाटत असले तर ते शक्य नाही. इराण हा तोडीस तोड उत्तर देत आहे त्यामुळे युद्ध थांबविण्यासाठी मोठ्या, मजबुत अशा मध्यस्थांची गरज आहे. ज्याचे अमेरिका व इराण एकले जावू शकते. सध्याला केवळ भारतात चिंता व्यक्त केली जात नाही तर जगात चिंता व्यक्त केली जात आहे. इंधनाची गरज जगाला आहे. खणीज संपत्ती इराणकडे मोठ्या प्रमाणात आहे. यावर डोळा हा अमेरिकेचा आहे हे लक्षात घेतले पाहिजे. देशात अजून ग्रामीण भागात जे टाकावू पदार्थ आहेत. जसे वाळलेला पाला-पोचोळा, लाकुड, तुराटी, शेंणाच्या गोवऱ्या आदिचा वापर हा इंधन म्हणून केला जातो. इंधनाचा वापर ग्रामीण भागात गॅसचा कमी होतो, अधिक वापर हा शहरी भागात होतो. शहरी भागात चुली मांडता येत नाहीत. धुराचा त्रास होतो तसे ग्रामीण भागात अजूनही नाही. सकाळी पाणी तापविण्यापासून ते स्वयंपाकापर्यंत चुलीचा वापर केला जातो. ही वस्तूस्थिती आहे. त्यामुळे गॅस टंचाईपेक्षा राजकारण अधिक होत असेल तर ते योग्य नाही. अमेरिकेच्या सुरक्षा परिषदेने आखाती देश आणि जॉर्डनवरील इराणच्या हल्ल्यांचा निषेध करणारा ठराव मंजूर केला आहे. या ठरावात इराणला हे हल्ले त्वरित थांबवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बुधवारी, १५ पैकी १३ सदस्यांनी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या ठरावाच्या बाजूने मतदान केले. हा ठराव आखाती सहकार्य परिषदेने मांडला होता आणि त्याला १३५ इतर संयुक्त राष्ट्र सदस्य देशांचा पाठिंबा मिळाला होता. चीन आणि रशिया मतदानापासून दूर राहिले असले तरी, त्यांनी ठराव रोखण्यासाठी त्यांच्या व्हेटो पॉवरचा वापर केला नाही. मुळात युद्ध तरी समाप्त झाले तरी याचे परिणाम जगाला भोगावे लागतील. स्वयंपाकाचा गॅसच्या किंमती इराण हा तेच ठेवणार नाही. युद्धात जी आर्थिक हानी झाली त्याची वसुली ही इंधनाच्या वाढीव दराने केल्या शिवाय राहाणार नाही. त्यामुळे युद्ध जरी संपले तरी आर्थिक झळ सोसण्याची तयारी ठेवावी लागणार आहे. इराण हा इंधन उत्पादक देश आहे. तो काही स्वस्तात इंधन पुरविणार नाही हे लक्षात घेता, आगामी काळात इंधनाच्या दरात वाढ होणार आहे याची दक्षता घेतली पाहिजे. आज जरी कृत्रिम टंचाई निर्माण काही प्रमाणात होताना दिसून येत आहे. खरीच टंचाई आहे का केली जात आहे हा संशोधनाचा विषय आहे. मात्र युद्धजन्य स्थितीत इंधनाचे मोठे संकट निर्माण झाले आहे हे मान्यच केले पाहिजे. यावर धैर्याने मुकाबला केला पाहिजे. यावर कशा प्रकारे मात करता येईल याचा विचार केला पाहिजे. संकट आहे का? आहे. मग घाबरता कामा नये. यावर मार्ग काढला जावा. गॅस सिलेंडरची टंचाई भासणार आहे. व्यावसायिक गॅस सिलेंडरचा तुटवडा होणार आहे. संकट आहे त्यावर राजकारण कोणी करू नये. जनतेनी याचा धैर्याने मुकाबला केला पाहिजे. पर्याय शोधला पाहिजे. संकट दूर करण्याची शक्ती अंगी निर्माण केली पाहिजे. संकट आले म्हणून रडत बसू नये तर धैर्याने मुकाबला करावा.

# शेतकरी मेळावा उत्साहात; आधुनिक शेती पद्धतींचे मार्गदर्शन



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यातील एरंडी सारोळा येथे ट्वेंटीवन ॲग्री प्रा. लि. आणि हिमालया वेलनेस कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला भव्य शेतकरी मेळावा उत्साहात आणि मोठ्या प्रतिसादात पार पडला. परिसरातील अनेक गावांमधून शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. आधुनिक शेती पद्धती, पर्यायी पिके आणि बाजारपेठेतील नवीन संधी याबाबत माहिती मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी या मेळाव्यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते तुळशीच्या रोपाला पाणी अर्पण करून करण्यात आली. भारतीय संस्कृतीत तुळशीला औषधी तसेच पवित्र स्थान असल्याने पर्यावरणपूरक शेतीचा संदेश देण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला. यावेळी विजय देशमुख, डॉ. अतुल जाधव, डॉ. आनंद पवार आणि धनंजय राऊत हे प्रमुख मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत शेतीतील बदलत्या परिस्थितीत नवीन पिकांकडे वळण्याची गरज अधोरेखित केली.

मेळाव्यात तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना सुगंधी व औषधी वनस्पतींची लागवड, उत्पादन तंत्रज्ञान, व्यवस्थापन आणि बाजारपेठेतील संधी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. पारंपरिक पिकांवर अवलंबून राहण्याऐवजी शेतकऱ्यांनी लेमनग्रास, अश्वगंधा, तुळस, सर्पगंधा, सतावरी यांसारख्या औषधी व सुगंधी पिकांची लागवड केल्यास कमी खर्चात अधिक उत्पादन आणि चांगले आर्थिक उत्पन्न मिळू शकते, असे तज्ज्ञांनी सांगितले.

तसेच या पिकांना औषधनिर्मिती कंपन्या, आयुर्वेदिक औषध उत्पादक, कॉस्मेटिक उद्योग तसेच सुगंधी तेल निर्मिती उद्योगात मोठ्या प्रमाणावर मागणी असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. योग्य नियोजन, तांत्रिक मार्गदर्शन आणि बाजारपेठेची माहिती मिळाल्यास शेतकऱ्यांना पारंपरिक शेतीपेक्षा अधिक नफा मिळवता येऊ शकतो, असे मत वक्त्यांनी व्यक्त केले.

या मेळाव्यात आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर यावरही विशेष भर देण्यात आला. ड्रिप सिंचन पद्धतीचा वापर, सेंद्रिय खतांचा योग्य वापर, माती परीक्षण, पीक व्यवस्थापन, तसेच थेट बाजारपेठेशी संपर्क ठेवण्याचे महत्त्व यावेळी अधोरेखित करण्यात आले. बदलत्या हवामान परिस्थितीत शाश्वत शेती कशी करावी याविषयीही मार्गदर्शन करण्यात आले.

मेळाव्यात उपस्थित शेतकऱ्यांनी तज्ज्ञांना विविध प्रश्न विचारून शेतीतील अडचणी, रोग व कीड नियंत्रण, उत्पादन वाढवण्याचे उपाय आणि बाजारपेठेतील संधी याबाबत मार्गदर्शन घेतले. तज्ज्ञांनी प्रत्यक्ष उदाहरणे देत शेतकऱ्यांच्या शंकांचे समाधान केले.

या प्रसंगी परिसरातील प्रगतिशील शेतकऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांच्या यशस्वी शेती प्रयोगांमुळे इतर शेतकऱ्यांना प्रेरणा मिळावी आणि नवीन तंत्रज्ञान स्वीकारण्याची प्रेरणा मिळावी हा या सत्काराचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिवन कहाटे यांनी केले, तर आभार प्रदर्शन धनंजय राऊत यांनी केले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी ट्वेंटीवन ॲग्री प्रा. लि. च्या कर्मचारी व आयोजकांनी विशेष परिश्रम घेतले. शेतकऱ्यांना नवीन शेती पद्धतींची माहिती देणारा आणि शेतीत बदल घडवून आणण्याची प्रेरणा देणारा हा मेळावा अत्यंत उपयुक्त ठरल्याची भावना उपस्थित शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

# कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण जयंती उत्साहात साजरी




बाभळगाव : दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्याल बाबळगावच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, दूरदर्शी नेते आणि विचारवंत यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून करण्यात आली.

या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याचा आणि त्यांच्या सर्वसमावेशक विचारांचा आढावा घेत विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय विकासात त्यांच्या योगदानाचे विशेष स्मरण करण्यात आले.

प्रमुख वक्ते प्रा. ज्ञानदेव कांबळे आपल्या भाषणात सांगितले की, "यशवंतराव चव्हाण हे केवळ राजकारणी नव्हते तर दूरदृष्टीचे राष्ट्रपुरुष होते. शिक्षण, सहकार आणि सर्वसमावेशक विकासाचा त्यांनी दिलेला आदर्श आजच्या तरुण पिढीसाठी मार्गदर्शक ठरतो. विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांमधून प्रेरणा घेऊन समाजभान जपले पाहिजे." तर अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे,

"यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांची प्रेरणा विद्यार्थ्यांच्या मनात रुजविणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असून त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प अध्यापक आणि विद्यार्थी यांनी करावा." अशी आव्हान केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. पांडुरंग मुंडे यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# क्रीडा ई-प्रमाण : घरबसल्या प्रमाणपत्र मिळवा

## खेळाडूंच्या ५ टक्के आरक्षणासाठी प्रणालीवर अभिलेख उपलब्ध

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्यातील गुणवंत खेळाडूंना शासकीय आणि निमशासकीय सेवांमध्ये ५ टक्के आरक्षणाचा लाभ अधिक सुलभ, पारदर्शक आणि जलद गतीने मिळावा, यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने 'क्रीडा ई-प्रमाण' ही ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारीत अद्ययावत प्रणाली कार्यान्वित केली आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारचा मानवी हस्तक्षेप किंवा फेरफार करणे शक्य नाही, ज्यामुळे बोगस प्रमाणपत्रांना पूर्णपणे आळा बसेल.

खेळाडूने माहिती भरल्यानंतर आणि मूळ डेटाशी ती जुळल्यास, अवघ्या २४ तासांच्या आत डिजिटल पडताळणी अहवाल उपलब्ध होतो. प्रत्येक प्रमाणपत्रावर एक अद्वितीय ठठ कोड असेल, जो स्कॅन करून संबंधित नियुक्ती प्राधिकारी (उदा. MPSC, पोलीस भरती) प्रमाणपत्राची सत्यता त्वरित पडताळू शकतील.

आगामी पदभरतीसाठी 'क्रीडा ई-प्रमाणपत्र' बंधनकारक

महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) तसेच इतर सर्व शासकीय पदभरतीसाठी अर्ज करताना खेळाडूंना आता या क्रीडा ई-प्रमाणपत्राची प्रत जोडणे अनिवार्य करण्यात आले आहे. या प्रमाणपत्राशिवाय खेळाडू संवर्गातून अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची सर्व खेळाडूंनी नोंद घ्यावी.

ज्या खेळाडूंनी यापूर्वी विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडून प्रमाणपत्रांची पडताळणी केलेली आहे, त्यांनी यापुढे शासकीय व निमशासकीय भरतीसाठी अर्ज सादर करावयाचा असल्यास, या प्रणालीद्वारे प्रमाणपत्र तयार करुन घेणे आवश्यक आहे.

प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याची पद्धती

या प्रणालीअंतर्गत ५ टक्के खेळाडू आरक्षणाचे संघटनेमार्फत प्राप्त अभिलेख 'क्रीडा ई-प्रमाण पोर्टलवर यशस्वीरित्या अपलोड करण्यात येत आहेत. या अभिलेखाद्वारे खेळाडू आपले ५ टक्के खेळाडू प्रमाणपत्र प्राप्त करुन घेऊ शकतात, यासाठी आवश्यक असणारा तपशील पुढील प्रमाणे.

खेळाडूंनी पोर्टलवर नोंदणी करणे अनिवार्य

ज्या खेळाडूंनी अधिकृत स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळवले आहे. अशा सर्व खेळाडूंनी क्रीडा विभागाच्या अधिकृत संकेतस्थळाला https://sports.maharashtra.gov.in/ भेट द्यावी.

संकेतस्थळावर सर्वात खाली आमच्या सेवा (Our Services) मध्ये 5% Reservation या टॅबमध्ये जाऊन आपली एक वेळ नोंदणी पूर्ण करावी. या नोंदणीकरिता, वैयक्तिक माहिती व क्रीडा ई-प्रमाण पोर्टलवर अर्ज या सर्व बाबींसाठी खालील माहिती खेळाडूंनी तयार ठेवावी.

नोंदणीसाठी खेळाडूंनी आपल्या आधार-संलग्न मोबाईल क्रमांकाचा आणि आयडीचा वापर करणे आवश्यक आहे.. स्वताचा योग्य व दैनंदिन वापर ई-मेल आय. डी.. आधार कार्ड पीडीएफ (Aadhar ID pdf format). क्रीडा स्पर्धेत प्राप्त प्रावीण्य प्रमाणपत्र (Certificate of the Competition pdf format). ज्या खेळांचे अभिलेख प्रणालीवर उपलब्ध आहे, त्यांनी तात्काळ या प्रणालीचा लाभ घेऊन आपले डिजिटल पडताळणी प्रमाणपत्र घरबसल्या प्राप्त करून घ्यावे.

स्पर्धेचे अभिलेख उपलब्ध नसल्यास 'Grievance' द्वारे करा अर्ज...

ज्या खेळाडूंची माहिती अभिलेखात किंवा प्रमाणपत्रे तांत्रिक कारणास्तव प्रणालीवर दिसत नसतील, तर supportkridaepramaan.org या ई-मेलवर आपली तक्रार आपल्याकडे असलेल्या क्रीडा प्रमाणपत्रासह नोंदवा. खेळाडूंनी आपले निवेदन सादर करताना खालील बाबीची पूर्तता करावी. आपण सहभागी झालेल्या स्पर्धेचे अचूक नाव व वर्ष नमूद करावे. आपल्याकडे उपलब्ध असलेल्या मूळ क्रीडा प्रमाणपत्राची स्कॅन केलेली प्रत निवेदनासोबत जोडावी. असे अर्ज प्राप्त झाल्यानंतर विभाग स्तरावर त्या माहितीची शहानिशा करून सदर अभिलेख पोर्टलवर अद्ययावत करण्याची कार्यवाही केली जाईल. अधिक माहितीसाठी आणि मार्गदर्शक सूचनांसाठी खेळाडूंनी https://sports.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळाला भेट द्यावी. तसेच अन्य खेळांचे अभिलेख प्रणालीवर उपलब्ध करुन दिल्यानंतरत्याबाबतची माहिती त्वरीत याद्वारे संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. कबड्डी, फेन्सिग, ट्रायथलॉन (२०२५ ची स्पर्धा), ज्युडो (२०२४ ची स्पर्धा), कुराश (२०२४-२५ व २०१७-१८) ह्या स्पर्धाचे अभिलेख ऑनलाईन उपलब्ध आहेत, त्याच खेळाडूंनी प्रमाणपत्रासाठी अर्ज करावेत. इतर पात्र खेळांच्या खेळाडूंनी नोंदणी करावी, इतर अभिलेख देखील अपलोड करण्याची कार्यवाही सुरु आहे, असे लातूर जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी कळविले आहे.

# आरोग्य विमाधारक केंद्रबिंदू मानून विमा कंपन्या व रुग्णालयांनी सेवा द्यावी- आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

## विमाधारकांच्या तक्रारींची शासन करणार शहानिशा



**मुंबई/प्रतिनिधी :** आरोग्य विमा कंपन्यांकडून क्लेम मंजुरीत येणाऱ्या अडचणी व रुग्णालयांची अवाजवी वैद्यकीय बिले याबाबतच्या तक्रारीच्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी मंत्रालयात, भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण, खासगी विमा कंपन्या व खासगी रुग्णालये यांची संयुक्त बैठक आयोजित केली होती. रुग्ण हा केंद्रबिंदू मानून खासगी विमा कंपन्या व रुग्णालयाने सेवा द्यावी असे निर्देश आरोग्यमंत्र्यांनी या बैठकीत दिले.

आरोग्य विमा कंपन्यांकडून क्लेम मंजुरीत येणाऱ्या अडचणी व खासगी रुग्णालयाकडून आकारली जाणारी वाजवी बिले. याबाबत आरोग्यमंत्र्यांकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने याबाबत निश्चित कार्यपध्दती निर्धारीत करण्यासाठी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी मंत्रालयात बैठक आयोजित केली होती. बैठकीस रिलायन्स, टाटा, एसबीआय, स्टार हेल्थ, एचडीएफसी, एआयजी, यासह राज्यातील प्रमुख विमा कंपन्या तसेच व्होकार्ड, लीलावती, जसलोक, रिलायन्स यासह राज्यातील प्रमुख रुग्णालयांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

विमा कंपनी आणि रुग्णालय व्यावसायिक पद्धतीने काम करत असली तरी रुग्ण हा केंद्रबिंदू असला पाहिजे. आरोग्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार विमा कंपन्या, खासगी रुग्णालये, भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण व आरोग्य विभागाचे प्रतिनिधी एका व्यासपिठावर येऊन रुग्ण कल्याणासाठी निश्चित कार्यपध्दती निर्धारित करण्याबाबत चर्चा झाली.

आरोग्यविमा घेणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर वाढत असुन त्यांना समाधानकारक सेवा देणे हे रुग्णालये व विमा कंपन्यांची जबाबदारी आहे. याबाबत चुकीचे निदर्शनास आल्यास शासन त्याबाबत योग्य ती कार्यवाही करेल. राज्यात मुंबई, पुणे, नागपूर सारख्या शहरात अद्यावत वैद्यकीय सेवा, तज्ञ डॉक्टर्स, व पायाभूत सुविधा उपलब्ध असल्यामुळे, मेडिकल टुरिझम व्यवसायाला मोठा वाव आहे. चांगली सेवा देऊन आपली विश्वासार्हता वाढवावी असेही आरोग्यमंत्र्यांनी सांगितले

राज्यातील सर्व रुग्णालयांनी भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण ( आयआरडीए ) च्या पोर्टलवर नोंदणी करून आवश्यक माहिती अद्ययावत ठेवावी, असे निर्देश देतानाच क्लेम मंजुरीसाठी निश्चित कालमर्यादा ठरविण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. हॉस्पिटल आणि विमा कंपन्यांमधील समन्वयाच्या अभावामुळे अनेकदा रुग्णांना मानसिक तसेच आर्थिक त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे रुग्णांना तात्काळ उपचार मिळावेत आणि क्लेम प्रक्रिया अधिक पारदर्शक व सुलभ व्हावी यासाठी शासन आवश्यक ते निर्णय घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यात सध्या सुमारे सात ते आठ हजार रुग्णालये विमा सेवा देत असून काही ठिकाणी गैरप्रकार होत असल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. अशा प्रकरणांमध्ये बॉम्बे नर्सिंग ॲक्ट अंतर्गत कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच मोठ्या रुग्णालयांनी उपचारांचे दर स्पष्ट करणारे दरपत्रक लावणे बंधनकारक करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली. एकाच आजारासाठी विविध रुग्णालयांमध्ये वेगवेगळे दर आकारले जात असल्याच्या पार्श्वभूमीवर स्टँडर्ड ट्रीटमेंट प्रोटोकॉल तयार करण्याची गरज बैठकीत व्यक्त करण्यात आली. तसेच विमा कंपन्या आणि रुग्णालयासाठी कॉमन 'एम्पॅनलमेंट यंत्रणा उभारण्याबाबतही विचार सुरू असल्याची माहिती आरोग्यमंत्र्यांनी दिली. यावेळी मंजूर व नाकारलेले क्लेम आणि प्राप्त तक्रारी याबाबतची माहिती नियमितपणे आरोग्य विभागाकडे सादर करण्यास सांगण्यात आले. भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण यांचेकडुन महाराष्ट्रातील तक्रारी प्राप्त करुन त्यावर अभ्यास व उपाययोजना करण्यात येणार असुन याबाबत कार्यवाही करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरणार आहे.

वैद्यकीय व्यवसायातील विश्वासार्हता वाढविणे ही शासनाची प्राथमिकता असून कोणत्याही रुग्णाला उपचार किंवा विमा क्लेम मिळण्यात अडचण येऊ नये यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे आरोग्यमंत्री आबिटकर यांनी स्पष्ट केले. या बैठकीस आरोग्य सेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, आरोग्य संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, सहसंचालक डॉ. सुनीता गोल्हाइत तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# निधी संपवण्यासाठी महापालिका शाळांच्या मुलांची सहल; महापालिकेच्या स्थायी समितीने दाखवला प्रशासनाला इंगा

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई महापालिकेच्या शाळांमधील मुलांची राणीबाग आणि बोरीवली नॅशनल पार्कमध्ये सहल आयोजित करण्याचा प्रस्ताव शिक्षण विभागाने अत्यंत घाईघाईत स्थायी समिती मंजुरीसाठी सादर केला. परंतु हा प्रस्ताव मुलांच्या सहलीपेक्षा यासाठी मंजूर निधी ३१ मार्च पूर्वी वापरण्यासाठी आणि पर्यायाने संस्थेची तिजोरी भरण्यासाठी असल्याचे स्पष्ट आरोपच करत हा प्रस्ताव राखून ठेवत प्रशासनाला आणखी एक इंगा दाखवला

स्थायी समितीच्या पटलावर शेवटच्या क्षणाला महापलिका शाळांमधील मुलांच्या सहलीचा प्रस्ताव मांडण्यात आल्यामुळे सभागृहनेते गणेश खणकर यांनी याला हरकत घेत हा प्रस्ताव मंजूर करण्याची घाई न करता राखून ठेवण्याची सूचना केली. यावर शिक्षण समिती अध्यक्षा राजेश्री शिरवडकर यांनी पाठिंबा देता इयत्ता ४थी आणि इयत्ता ७वीच्या विद्यार्थ्यांसाठी काढण्यात येणाऱ्या सहलीसाठी एकमेव संस्थेची निवड कशी केली असा सवाल उपस्थित केला. तसेच तब्बल ६६०० मुलांना घेवून जाणारी ही संस्था सुपरमॅन आहे का असा सवाल करत या मुलांची काळजी कोण घेणार अशी चिंता व्यक्त केली. सध्या परिक्षांचे दिवस आहेत, अशात या मुलांना कोणते पालक पाठवणार असाही सवाल केला. तर याला यामिनी जाधव यांनी पाठिंबा देत केवळ प्रत्येक मुलांमागे ७३० रुपये देण्यात येणार आहे मग त्यांना खायला काय देणार याचाही कुठेही उल्लेख नसल्याचे सांगितले. तर अश्रफ आझमी यांनी आचारसंहितेमुळे सहल आयोजित करता आली नसल्याचे सांगत शिक्षण विभागाचे समर्थन करण्याचा प्रयत्न केला.

# खरेदी करताना नेहमी जागरूक ग्राहक व्हा



रविवार होता. चिन्मयकडे घरी आज सगळेच घरी होते. सकाळचा नाश्ता म्हणून आज ब्रेड सँडविच करायचे सर्वानुमते ठरल्यावर आईने चिन्मयला दुकानातून सँडविचसाठी ब्रेड आणण्यासाठी दुकानात पाठविले. चिन्मय उडय़ा मारत गेला आणि दुकानातून ब्रेड घेऊन आला.

आईने ब्रेडचे पाकीट उघडताना सवयीप्रमाणे त्यावर असलेल्या नोंदी वाचल्या. त्यावर ब्रेड तयार केल्याचा दिनांक पाहताच तिला कळले की याची वापरायची तारीख होऊन गेली आहे. लहान मुलगा पाहून दुकानदाराने चिन्मयच्या हाती हा ब्रेड दिला असणार, हे तिने ओळखले आणि चिन्मयबरोबर त्याच्या ताईला तो ब्रेड बदलून आणण्यासाठी परत दुकानात पाठवले. ताईने दुकानदाराला त्याबद्दल विचारणा करताच त्याने माफी मागून दुसरा ताजा ब्रेड दिला.

या सगळ्या गडबडीत नाश्ता करण्यासाठी उशीर झाला होता म्हणून आई चिन्मयला म्हणाली, ङ्गङ्गआता आधी मी सर्वाना गरम गरम ग्रील सँडविच करून खायला देते. आणि चिन्मय तुला, यापुढे दुकानातून कुठलाही खाण्याचा जिन्नस आणताना किंवा इतर वस्तू खरेदी करताना काय खबरदारी घ्यावी याबद्दल सविस्तर सांगते.


चिन्मयबरोबर सगळ्यांनी गरमागरम ग्रील सँडविच खाल्ले. नंतर आईने चिन्मयला जवळ घेतले आणि त्याला दुकानात गेल्यावर एखादी वेष्टनात बंद वस्तू खरेदी करताना काय काळजी घ्यावी, कुठल्या गोष्टीची खातरजमा करून वस्तू विकत घ्यायची याची व्यवस्थित माहिती दिली. ज्या वस्तू वेष्टनात बंद करून विकायला ठेवलेल्या असतात त्यावर ती वस्तू तयार केल्याचा दिनांक, त्या वस्तूचे वजन, त्या वस्तूची विक्रीची किंमत, ज्या कंपनीने ती वस्तू बनवलेली असेल त्या कंपनीचे नाव, पत्ता, काही वस्तू हाताळताना किंवा वापरताना घ्यावयाची विशेष काळजी घेण्यासंबधी सूचना..

आणि खाद्य वस्तू असल्यास ती किती तारखेपर्यंत खाण्यायोग्य असेल यासंबंधी स्पष्ट उल्लेख असणे; शिवाय ती शाकाहारी आहे की मांसाहारी पदार्थापासून बनवलेली आहे यासंबंधी लाल किंवा हिरव्या रंगाची विशिष्ट, गोल आकाराची खूण असणे कायद्याने बंधनकारक आहे. शिवाय अशा पाकीटबंद खाद्यपदार्थावर असे तिरक्या अक्षरात लिहिलेले आहे की नाही हेदेखील तपासून पाहिले पाहिजे. ही खूण खाद्यपदार्थ खाण्यायोग्य आहे याची निशाणी असते. ग्राहकांच्या हितासाठी असा कायदा करण्यात आला आहे. हे झाले इतर वस्तू आणि खाण्याचे जिन्नस विकत घेताना घेण्याच्या काळजीसंबंधी. औषधे खरेदी करताना आणि ती वापरताना यासबंधी अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. मग आईने घरातील इतर वेष्टनात बंद असलेल्या खाण्याच्या वस्तू आणि औषधे यांच्या वेष्टनावरच्या त्या सर्व नोंदी कशा आणि कशा- कशाच्या आहेत ते चिन्मयला नीट समजावून सांगितले आणि त्याचे महत्त्वदेखील समजावून दिले.

बाबा म्हणाले, ङ्गङ्गअरे चिन्मय, पूर्वी घरातील मोठी माणसे वस्तूंची खरेदी करत असत आणि घरी आणून देत असत. पण आता तुम्ही शाळकरी मुलेदेखील ग्राहक झाला आहात. आता मुलेदेखील कधीतरी दुकानात जाऊन काही वस्तूंची खरेदी करू लागली आहेत. त्यामुळे एक ग्राहक म्हणून बाजारात खरेदी करायला गेल्यावर इतर वस्तू म्हणा, खाण्याचे पदार्थ म्हणा किंवा औषधे म्हणा.. खरेदी करताना काही गोष्टींची खातरजमा करून घेतली पाहिजे. ग्राहकहित जपण्यासाठी सरकारने यासाठी काही नियम आणि कायदे केले आहेत. ते काय आहेत, यासंबंधी मोठय़ा माणसांबरोबरच लहान मुलांनी नीट माहिती करून घेतली पाहिजे. यापुढे हे लक्षात ठेव आणि तुझ्या मित्रांनाही हे नीट सर्व समजून सांग. कारण ते आपल्या सर्वाच्या हिताचे आहे. म्हणजे कोणीही विक्रेता ग्राहकाची फसवणूक करणार नाही आणि योग्य ती वस्तू योग्य त्या किमतीत आणि योग्य त्या वजनाची आपल्याला मिळेल.

दुसऱ्या दिवशी आई आणि चिन्मय एका दुकानात गेले होते. आई सांगेल ती वस्तू चिन्मय घेऊन त्यावरील सर्व तपशील निरखून घेत होता, आईला दाखवत होता आणि पिशवीत ठेवत होता. त्याचे पाहून दुकानात आलेली इतर मुलेही त्याच्यासारखेच आई-बाबांना दाखवून वस्तू घेत होती. कारण आता मोठी माणसेच नाही तर लहान मुलेही जागरूक ग्राहक होऊन खरेदी करत होती आणि यापुढे करणार होती.

# सर्वोत्कृष्ट भक्ती मार्ग आचार्य दिव्यचेतनानंद



विद्वानांनुसार, ईश्वर प्राप्तीचे ३ मार्ग आहेत-ज्ञान, कर्म व भक्ती. खरंतर हेच ज्ञान आहे की, ज्या माध्यमातून ईश्वर कोण आहे? हे आपण जाणतो. ज्ञानाचा संग्रह आपल्या मेंदूत असतो व निर्विवादपणे हे आपणास ईश्वरकडूनच मिळते. मानवाचा मेंदू छोटा असतो मग अशा स्थितीत तो ईश्वराला कसा जाणू शकेल? हा प्रश्न निर्माण होतो. वास्तवात मेंदूत असलेल्या ज्ञानानेच हे शक्य होऊ शकते. ज्ञानामुळे मन तृप्त होते. श्रीआनंदमूर्तिके यांच्यानुसार, जोपर्यंत मानवात ज्ञानाची जाणीव राहिल तोपर्यंत त्याने ज्ञान ग्रहण करत राहिले पाहिजे. एका मर्यादेनंतर आपल्या ज्ञानाची भूक मंदावते कारण तोपर्यंत आपले लक्ष्य ईश्वर प्राप्ती होते.काही विद्वान मानतात की, कर्मामुळे ईश्वर प्राप्ती होते कारण कर्म न करता मनुष्य एक क्षण सुद्धा जिवंत राहू शकत नाही. म्हणून आपण कर्म करत राहिले पाहिजे पण कर्म चांगले असायला हवेत. गीतेत प्रभू श्रीकृष्णाने मानवास कुठल्याही फळाची अपेक्षा न करता कर्म करत राहण्याचा सल्ला दिला आहे. सांगण्याचे तात्पर्य धार्मिक व आध्यात्मिक जगात ज्ञानाला जेवढी किंमत आहे त्यापेक्षा कमी कर्माची नाही. विद्वान म्हणतात की, जर निर्मळ भावाने ईश्वराची भक्ती केली तर ते सहज मिळतील. खरंतर भक्ती मार्गाची कास मोठ-मोठ्या ज्ञानवंतांनी चोखाळली आहे. आपण सर्व मानतो की, सृष्टीची निर्मिती ईश्वरानेच केली आहे.म्हणून जगातील प्रत्येक जीव परमात्म्याचे संतान आहे. जर आपण परमात्माला प्रसन्न करू इच्छित असाल तर त्यांची संतान म्हणजे प्रत्येक जीवप्रती प्रेम-भाव ठेवा व यासाठी आपण मानवसेवा व समाजसेवा केली पाहिजे तसेच निराधारांना आधार दिला पाहिजे. मानवसेवा करताना आपण नेहमी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, हा सर्व खटाटोप ईश्वर प्राप्तीसाठी केला जात आहे. खरंतर हीच भक्ती आहे. त्यामागे दुसरे कुठलेही कारण नाही. जर भक्तीभाव निर्माण झाला तर ईश्वर प्राप्तीचा मार्ग मिळाला, असे समजा.

# इतर देशांसोबतच भारतालाही ऊर्जा टंचाईचा ताप

'हरित ऊर्जा', 'पर्यायी ऊर्जा' यांचे गोडवे गायले तरी सध्या जीवाश्म इंधनास पर्याय नाही हे या युद्धाने दाखवून दिले. आयात इंधनावर भारत अवलंबून असल्याने 'स्वयंपूर्ण'तेच्या गप्पा फोल आहेत हेही दिसले.

पश्चिम आशियातील युद्धाचा परिणाम आता सामान्य भारतीयांच्या घरापर्यंत पोचला आहे. तेथून भारतात होणारी खनिज तेल तसेच 'एलएनजी' व 'एलपीजी'या वायूंची आयात घटली आहे. केंद्र सरकारने स्वयंपाकाच्या गॅसची किंमत वाढवली आहे, तरी त्याची टंचाई कुटुंबांना व हॉटेल उद्योगास जाणवू लागली आहे. गॅस सिलिंडर मिळवण्यासाठी अनेक शहरांत/गावांत लांब रांगा दिसत आहेत. तासन् तास रांगेत थांबूनही सिलिंडर मिळण्याची खात्री देता येत नाही. शहरांमध्ये घरगुती गॅसच्या सिलिंडर्सचा काळाबाजार सुरूही झाला आहे. ते सिलिंडर मिळवण्यासाठी हॉटेल व्यावसायिक किंवा खाद्य पदार्थांचे निर्माते जास्त पैसे मोजत आहेत. त्याची वसुली ग्राहकांकडून होणार हे उघड आहे. गॅसच्या सिलिंडर्सची साठेबाजी टाळण्यासाठी त्याची नोंदणी करण्याची मुदत २१ वरून २५ दिवस करण्यात आली आहे. मात्र जो पर्यंत सिलिंडर्सचा पुरवठा नियमित होत नाही तो पर्यंत अशा उपायांचा उपयोग होणार नाही. नैसर्गिक वायूचा पुरवठा सुरळीत व्हावा या साठी केंद्र सरकारने जीवनावश्यक वस्तू कायदा अमलात आणला आहे. वायूच्या




कमतरतेचा परिणाम विविध क्षेत्रांवर होत असल्याने 'प्राधान्य' क्षेत्रांना त्यांच्या गरजेनुसार तो मिळावा हा त्यामागचा हेतू असला तरीही त्यातही कपात केली जाणार आहेच.

**अनेक क्षेत्रांना फटका**

अमेरिकेने इराणवर पहिला हल्ला केल्यानंतर अक्षरश: काही तासांत खनिज तेल, नैसर्गिक वायू, द्रवरूप पेट्रोलियम वायू यांचे दर आंतरराष्ट्रीय बाजारात वाढले. खनिज तेलाचा दर १२० डॉलर्स प्रति पिंप झाला.'युद्ध लवकरच संपेल' अशी घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केल्याने ते थोडे उतरले. तरीही ते सध्या ८७ डॉलर्सच्या आसपास आहेत. युद्ध सुरू होताच कतारने द्रवरूप नैसर्गिक वायूचे उत्पादन थांबवले. त्यामुळे त्याची टंचाई निर्माण होऊन दरही वाढले. त्याही पेक्षा मुख्य मुद्दा या इंधनांच्या आयातीचा आहे. इराणने होर्मुझची सामुद्रधुनी बंद केल्याने खनिज तेल, वायू यांची वाहतूक जवळपास बंद झाली. आपल्या गरजेच्या ५० टक्के नैसर्गिक वायू व ६० टक्के एलपीजी भारत आयात करतो. ती मुख्यत्वे होर्मुझमधून होते. सिलिंडरमध्ये एलपीजी भरण्याचे कारखाने देशात अनेक ठिकाणी असले तरी त्या वायूची आयात घटल्याने पेच निर्माण झाला आहे. रिलायन्स सारख्या मोठ्या उद्योगांनी सरकारला सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे. परंतु त्यांच्या शुद्धीकरण प्रकल्पातून कोणत्या दराने पेट्रोल व गॅस मिळेल ते स्पष्ट नाही. त्यांचा दर जास्त असू शकतो व ग्राहकांवर त्याचा भुर्दंड पडणार हे वास्तव स्वीकारावे लागेल. पेट्रो रसायन प्रकल्प, गॅसवर आधारित वीज निर्मिती प्रकल्प आणि घरगुती ग्राहक यांना सरकारने प्राधान्य क्षेत्र म्हटले आहे. मात्र त्यांना होणारा गॅसचा पुरवठाही थोडा कमी होणार हे सरकारने जाहीर केले आहे. याचा अर्थ वीज निर्मिती कमी होऊ शकते व जनतेस वीज पुरवठा कपातीस सामोरे जावे लागू शकते. घरांना पाईप द्वारे पुरवला जाणारा नैसर्गिक वायू, वाहनांसाठी नैसर्गिक वायू (सीएनजी) व स्वयंपाकाचा गॅस (एलपीजी) यांनाही 'प्राधान्य' क्षेत्र ठरवण्यात आले असून त्यांचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. देशात त्याचे फार उत्पादन होत नसल्याने आयात किमान सुरळीत होईपर्यंत सर्वांनाच टंचाईची झळ बसणार आहे. खत निर्मितीसाठी नैसर्गिक वायूची गरज असते. त्या प्रकल्पांच्या गेल्या ६ महिन्यांतील सरासरी वापराच्या ७० टक्के गॅस त्यांना पुरवला जाणार आहे. त्यामुळे खताचे उत्पादन घटण्याची शक्यता आहे. पोलाद व चहा उद्योगासही कमी गॅस पुरवला जाणार आहे. हे दोन्ही उद्योग घरगुती बाजारपेठ व निर्यातीवर अवलंबून आहेत. त्यांचे उत्पादन व विक्री घटल्यास त्यांचे दर वाढतील. पेट्रोल व डीझेल यांची अजून तरी टंचाई जाणवत नसली तरी युद्ध लांबले व होर्मुझची सामुद्र धुनी बंद राहिली तर इंधनाची टंचाई तीव्र होईल. त्यामुळे सर्वसाधारण महागाई वाढेल आणि विकास दरावरही प्रतिकूल परिणाम होईल. ते टाळण्यास सरकारकडे सध्या तरी फारसे पर्याय नाहीत.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा



**पोष्टीक खा आणि रोगाला दूर ठेवा**

नव्या वर्षात तुम्ही फिटनेसच्या दृष्टीनं काही संकल्प करत असाल तर त्याची सुरुवात आतापासून करणं गरजेचं आहे. सध्याचा काळात अत्याधुनिक जिम आणि उत्तम व अनुभवी व्यायाम प्रशिक्षक या सर्वांमुळे कठीण वाटणारा व्यायाम आता सोपा वाटू लागला आहे. तसंच काळाची गरज जाणून अनेकांती पावलं जिमच्या दिशेनं वळू लागली आहेत. तुमच्या संकल्पाच्या दृष्टीनं फायदेशीर ठरतील अशा व्यायामाच्या प्रकारांविषयी आजच्या लेखातून जाणून घेऊ या. (**क्रमशः**)


## २ Joke — विनोद




राधा : काय गं राणी, तुझ्या नवऱ्याला तुरुंगात का जावे लागले?


राणी : काय नाही गं, यांनी नोटा छापायची सरकारशी स्पर्धा केली म्हणून.

## ३ Message — संदेश



Tourist = Ye kiska kankaal hai..? anta = Ye tipu-sultaan ka kankaal hai.. Tourist = Or ye bagal wala chhota sa kankaal kiska hai..? Santa = Ye bhi tipu-sultaan ka kankaal hai.. jab wo chhota bachcha tha….

## ४ Thought — सुविचार




शब्दांपेक्षा मौनच जास्त बोलके असते.
- कार्लाइल

**संस्कृत सुभाषित**

**आयु: सत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धना:।**
रस्या: ास्निग्धा: ास्थिरा हृद्या आहारा:
साात्विकप्रिया : ।।

अर्थ - जो आहार आयुष्य, मनोबल, शक्ती, प्रेम, सुख यांचे संवर्धन करतो, तोच आहार साात्विक लोकांना प्रिय असतो.(हा स्निग्ध आणि रसमय आहार असतो.)

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. रमेश देवबरोबरच्या या सिनेमात सीमा खलनायिका होती
६. ऐनवेळी कच खाणारा
११. न्याय
१२. सोशिकपणा
१४. नवरा
१५. अरण्य
१६. लोटी
१८. उगवत्या सूर्याचा देश
२१. च्या पुढे, समक्ष
२३. वेळेचा कमीत कमी भाग
२४. विरोध, प्रतिबंध
२७. पत, प्रतिष्ठा
२८. शंकराजवळचे चर्मवाद्य
२९. टप्प्याने टप्प्याने केलेला प्रवास
३२. अवधान, लक्ष
३३. भडक
३६. पळून जाणे
३९. कलावंत
४१. मत नोंदवण्याचा कालबाह्य कागद
४४. सोसाट्याचा वारा
४५. पवित्र
४६. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
४९. परिस्थिती, कालाचे परिमाण
५२. सामान
५३. बस्तान
५४. मज्जाव
५६. आश्रय, थारा
५८. प्रकाश निर्माण करणारा सूर्य
६०. वाहणारी हवा
६१. जन्मदाते
६३. पाणी
६५. दक्ष
६६. यजमान
६७. आरोप, बालंट
६८. प्रयाण
६९. लोकमानस
७१. इच्छा, आकांक्षा (हिंदी)
७३. आपल्या उत्तर सीमेवरील एक राष्ट्र
७५. किंचित ओलावलेले (डोळे) (हिंदी)
७६. कामाचा उरका
७८. शिव
८०. अवाजवी
८२. भाजपा नेते 'नितीन ----'
८४. संथ
८५. स्तुतीची गाणी
८६. दुःखी होणे, वेदनेने ओरडणे

### उभे शब्द

१. लकब
२. खिशाला चाट
३. धास्ती, भीती
४. आपले राष्ट्रगीत
५. आलटापालट
७. खून
८. शिकारीसाठी हेरलेला प्राणी
९. डोसा
१०. शरीर, काया
१३. गलबताचे कापड
१७. भाकरी व इतर पदार्थांचा कुस्करा, दूधभाकरी
१९. वैमानिक (इंग्रजी)
२०. अंकुर
२२. रम्य, मनोहर
२५. दात
२६. अंधार
२७. फोडणीचे वरण
३०. प्रचंड
३१. जपजाप्य
३४. बगळा
३५. थेळ, सरळ
३७. लोकरीचा एक प्रकार
३८. लग्नकार्याचे लेखी आमंत्रण
४०. लबाडीचा हेतू
४२. सर्वस्वाने
४३. यापेक्षा 'आज' महत्त्वाचा
४५. पालनपोषण करणारा
४७. शोभणारा
४८. मृत्यूदेवता
५०. जयश्री गडकरचा चंद्रकांत गोखले यांच्या बरोबरचा गाजलेला चित्रपट
५१. नूतन
५२. तंबाखूचा असल्यास घातक
५५. मानबिंदू (ला.)
५७. कमळ
५८. दिवस
५९. कणीदार
६०. संसारातून अंग काढून घेणे
६१. सुखाच्या मोजमापाचे धान्य
६२. दाह, मत्सर
६४. मिरवणूक
६५. पत्राचा कालबाह्य झालेला मायना
६६. नम्रतेने मान खाली घालणे
६७अ. आल्या पावली, लगेच
७०. 'राही --- दुख की चिंता क्यों सताती है' (दोस्ती)
७२. थकवा
७४. सांभाळ
७७. खाली खेचणे, पराभूत करणे
७८. अधिकाराचे स्थान
७९. त्रासलेला
८०. शर्त
८२. माराची उठलेली खूण
८३. अस्वल

### आडवे उत्तरे

१.अपराध ६.अवसानघातकी ११.दाद १२.सहनशीलता १४.धव १५.वन १६.गडवा १८.जपान २१.समोर २३.क्षण २४.हरकत २७.आब २८.डमरू २९.मजलदरमजल ३२.भान ३३.बटबटीत ३६.पलायन ३९.कलाकार ४१.मतपत्रिका ४४.वादळ ४५.पाक ४६.पसायदान ४९.कालमान ५२.माल ५३.जम ५४.मना ५६.निवारा ५८.दिवाकर ६०.वारा ६१.जनकजननी ६३.जीवन ६५.सावध ६६.नवरा ६७.किटाळ ६८.प्रस्थान ६९.जनमत ७१.तमन्ना ७३.नेपाळ ७५.नम ७६.रपाटा ७८.पवित्र ८०.अवास्तव ८२.गडकरी ८४.मंद ८५.स्तवन ८६.कळवळणे

### उभे उत्तरे

१.अदा २.पदरमोड ३.धसका ४.जन गण मन ५.हलवाहलवी ७.वध ८.सावज ९.घावन १०.तन १३.शीड १७.भाकरकाला १९.पायलट २०.कोंब २२.रमणीय २५.रद २६.तम २७.आमटी ३०.जबरदस्त ३१.जपतप ३४.बक ३५.तडक ३७.नमदा ३८.पत्रिका ४०.कावा ४२.तनमनधनाने ४३.काल ४५.पालक ४७.साजरा ४८.यम ५०.मानिनी ५१.नवा ५२.मावा ५५.नाक ५७.राजीव ५८.दिन ५९.रवाळ ६०.वानप्रस्थ ६१.जव ६२.जळजळ ६४.वरात ६५.सा न वि वि ६६.नतमस्तक ६७अ.टाकोटाक ७०.मनवा ७२.मरगळ ७४.पालन ७७.पाडणे ७८.पद ७९.त्रस्त ८०.अट ८२.वळ ८३.रीस



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त



### कॅप्टन शाहीनने कुणावर फोडले पराभवाचे खापर?

**मुंबई**–आयसीसी टी–ट्वेंटी वर्ल्ड कपमधून बाहेर होऊन पाकिस्तानला दोन आठवडे पूर्ण झाले तरी देखील पाकिस्तानच्या डोक्यातून टी–ट्वेंटी भूत उतरत नसल्याचं पहायला मिळतंय. बांग्लादेश आणि पाकिस्तान यांच्यात वनडे मालिका खेळवली जात आहे. या सामन्यात पाकिस्तानचा दारूण पराभव झाला. ५० ओव्हरच्या मॅचमध्ये पाकिस्तानचा संघ फक्त ३० ओव्हरमध्ये ऑल आऊट झाला अन् बांगलादेशने १५ ओव्हरमध्येच मॅच नावावर केली. बांगलादेशसमोर विजयासाठी फक्त ११५ धावांचे लक्ष होते. बांगलादेशविरुद्धच्या मॅचमध्ये झालेल्या पराभवानंतर पाकिस्तानचा कॅप्टन शाहीन शाह आफ्रिदी याने आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे. शाहीन शाह आफ्रिदीने मान्य केलं की, टीमला ज्या प्रकारच्या सुरुवातीची अपेक्षा होती, तशी सुरुवात या पहिल्या मॅचमध्ये होऊ शकली नाही. नाहिद राणा याने अतिशय भेदक बॉलिंग केली आणि त्याने पाकिस्तानच्या बॅटिंग लाईनअपला अडचणीत आणलं, असं म्हणत शाहीनने नाहिद राणावर पराभवाचं खापर फोडलं.

पराभवानंतर बोलताना शाहीन म्हणाला की, जेव्हा तुम्ही मॅच हरता तेव्हा चर्चा करण्यासाठी अनेक मुद्दे असतात. मात्र, ही एक तरुण टीम असून मी या खेळाडूंच्या पाठीशी शेवटपर्यंत खंबीरपणे उभा राहीन.

### तेंडुलकरने दबावाखाली घेतला होता का निवृत्तीचा निर्णय?

**मुंबई**–भारतीय क्रिकेटचा इतिहास जिथेही लिहिला जातो, तिथे सर्वप्रथम आठवते ते नाव म्हणजे सचिन तेंडुलकर! मक्रिकेटचा देवफ, ममास्टर ब्लास्टरफ अशी अनेक बिरुदे मिळवणाऱ्या या महान फलंदाजाने २४ वर्षांच्या दीर्घ आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत असंख्य विक्रम प्रस्थापित केले. कसोटी आणि एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणारा खेळाडू म्हणून त्याने क्रिकेटविश्वात वेगळी ओळख निर्माण केली. २०१३ मध्ये त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली असली तरी आजही चाहत्यांच्या मनात त्याची आठवण ताजी आहे. मात्र त्याच्या निवृत्तीबाबत अलीकडेच एक धक्कादायक खुलासा समोर आला आहे.बीसीसीआय सचिनला संघातून वगळण्याच्या तयारीत होते? माजी मुख्य निवडकर्ता संदीप पाटील यांनी एका मुलाखतीत सांगितले की, २०१२ मध्ये खराब फॉर्ममुळे भारतीय क्रिकेट नियामक मंडळ सचिन तेंडुलकर यांना भारतीय संघातून वगळण्याचा विचार करत होती. संदीप पाटील यांच्या म्हणण्यानुसार, त्यांनी सचिनशी त्यांच्या भविष्यातील योजनांबद्दल चर्चा केली होती. त्यावेळी सचिन अजून खेळत राहण्याच्या विचारात होते.

### ५ टक्के आरक्षणासाठी 'क्रीडा ई-प्रमाण' प्रणाली कार्यान्वित

**मुंबई**–गुणवंत खेळाडूंना शासकीय व निमशासकीय सेवांमध्ये ५ टक्के आरक्षणाचा लाभ अधिक सुलभ, पारदर्शक आणि जलद गतीने मिळावा यासाठी मक्रीडा ई–प्रमाणफ ही ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित अद्ययावत प्रणाली सुरू केली असल्याची माहिती क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविली आहे.

सदर प्रणालीद्वारे खेळाडूंना डिजिटल पडताळणीसह प्रमाणपत्र मिळणार आहे. यावर असलेल्या क्युआर कोडमुळे प्रमाणपत्राची सत्यता संबंधित नियुक्ती प्राधिकरण त्वरित तपासू शकतील. महाराष्ट्र लोकसेवा आयोग (चझडउ) तसेच इतर सर्व शासकीय पदभरतीसाठी अर्ज करताना खेळाडूंनी मक्रीडा ई–प्रमाणपत्रफ जोडणे अनिवार्य करण्यात आले आहे. खेळाडूंनी https://sports.maharashtra.gov.in या संकेतस्थळाला भेट देऊन मक्रीडा ई–प्रमाणपत्रफ प्राप्त करून घ्यावे, त्याचप्रमाणे जर एखाद्या खेळाडूची माहिती प्रणालीवर उपलब्ध नसल्यास (email protected) या ई–मेलवर स्पर्धेचे नाव, वर्ष आणि प्रमाणपत्राची स्कॅन प्रत पाठवून तक्रार नोंदवता येईल. त्यानंतर विभागस्तरावर पडताळणी करून अभिलेख पोर्टलवर अद्ययावत करण्यात येतील.

### सूर्यकुमार आणि वर्मा यांची ट्रुझॉन सोलरमध्ये गुंतवणूक

मुंबई–सनटेक एनर्जी सिस्टम्स प्रायव्हेट लिमिटेडच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या अग्रगण्य सौर समाधान प्रदाता ट्रुझॉन सोलरमध्ये भारताच्या आयसीसी पुरुष टी–२० विश्वचषक २०२६ विजेत्या संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव आणि त्याच संघातील खेळाडू तिलक वर्मा यांनी धोरणात्मक गुंतवणूक केल्याची घोषणा करण्यात आली आहे. या गुंतवणुकीमुळे भारतातील झपाट्याने विस्तारत असलेल्या अक्षय ऊर्जा क्षेत्रात कंपनीच्या वाढीला अधिक चालना मिळणार आहे.ट्रुझॉनचे व्यवस्थापकीय संचालक भवानी सुरेश काय म्हणाले? ट्रुझॉन सोलरचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक चारुगुंडला भवानी सुरेश यांनी सांगितले की, या दोन्ही क्रिकेटपटूंनी कंपनीत गुंतवणूक करून संस्थेच्या दीर्घकालीन दृष्टीकोनावर तसेच भारताच्या स्वच्छ ऊर्जा संक्रमणातील तिच्या भूमिकेवर विश्वास व्यक्त केला आहे. मफट्रुझॉन सोलरने सौरऊर्जा उद्योगात १७ वर्षांहून अधिक काळाचा प्रवास पूर्ण केला आहे. या काळात आमचे मुख्य लक्ष विश्वासार्ह सौर उपाय उपलब्धकरून देण्यावर आणि मजबूत विक्रीनंतरच्या सेवा नेटवर्कची उभारणी करण्यावर राहिले आहे.

## खेळाडूंच्या जीवित आणि सुरक्षेच्या दृष्टीने...

**फिफाने ठोठावला इराणला दंड**

# ट्रम्प यांचे मोठे वक्तव्य; इराणला २०२६ फिफा विश्वचषकापूर्वी दिला इशारा

**वाशिंटन:** टी–२० विश्वचषकानंतर आता सर्वांच्या नजरा यंदा होणाऱ्या फिफा विश्वचषकावर असणार आहेत. पण यापूर्वी मध्य पूर्वेत सुरू असलेल्या युद्धादरम्यान डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला स्पर्धेत खेळण्यापासून परावृत्त केलं आहे.





डोनाल्ड ट्रम्प यांचा इराणला फिफा विश्वचषकात न खेळण्याचा सल्ला (फोटो–एक्सप्रेस)

ऊरश्रव ढीींि वळीर्लेीरसशी खीरप षीा श्रिरूळपस रीं २०२६ ऋखऋअ थीश्रव र्उीि: क्रिकेटमधील टी–२० विश्वचषकानंतर आता फुटबॉलप्रेमींच्या नजरा यंदा होणाऱ्या फिफा विश्वचषकावर आहेत. फुटबॉलमधील सर्वोच्च स्पर्धा असलेला फिफा विश्वचषक अवघ्या २ महिन्यांवर येऊन ठेपला आहे. या विश्वचषकात इराणचा संघदेखील उतरणार आहे. पण सध्याच्या स्थितीला मध्य पूर्वेमधील युद्धजन्य परिस्थिती पाहता स्पर्धेवर याचा परिणाम होणार का, यावर सर्वांच्या नजरा आहेत. पण यादरम्यान ट्रम्प यांनी इराण संघाला स्पर्धेत खेळण्यापासून परावृत्त केलं आहे. यंदाचा फिफा विश्वचषक ११ जून ते १९ जुलैदरम्यान अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको यांच्या संयुक्त यजमानपदाखाली होणार आहे.

इराणचे क्रीडामंत्री अहमद दोन्यामाली यांनी ङ्गकोणत्याही परिस्थितीत इराण यंदाच्या फिफा विश्वचषकात सहभागी होऊ शकत नाही,ङ्घ असं वक्तव्य केलं होतं. यानंतर एक दिवसातच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही याबाबत प्रतिक्रिया दिली. अमेरिकेच्या सहआयोजकत्वाखाली होणाऱ्या या स्पर्धेत इराणच्या फुटबॉल संघाने सहभागी होणं ङ्गयोग्य ठरणार नाही,ङ्घ असं ट्रम्प यांनी गुरुवारी सांगितलं. तसेच अमेरिका आणि इराण यांच्यात सध्या युद्धजन्य परिस्थिती असल्यामुळे खेळाडूंच्या ङ्गस्वतःच्या जीवित आणि सुरक्षेच्या दृष्टीनेङ्घ त्यांनी स्पर्धेत सहभागी होऊ नये, असंही त्यांनी म्हटलं.

डोनाल्ड ट्रम्प यांचा इराणला फिफा विश्वचषकात न खेळण्याचा सल्ला

ङ्गइराण राष्ट्रीय फुटबॉल संघाचे विश्वचषकात स्वागत आहे. पण त्यांच्या स्वतःच्या जीवित आणि सुरक्षिच्या दृष्टीने त्यांनी स्पर्धेत खेळणं योग्य आहे, असे मला खरोखर वाटत नाही.ङ्घ असं ट्रम्प यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये लिहिलं.

डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेलं हे वक्तव्य मंगळवारी व्हाईट हाऊसमध्ये फिफाचे अध्यक्ष जियानी इन्फांटिनो यांना दिलेल्या संदेशापेक्षा काहीसं वेगळं असल्याचं दिसत आहे. इन्फांटिनो यांनी नंतर सार्वजनिकरित्या सांगितलं होतं की, ट्रम्प यांनी इराणच्या खेळाडू आणि प्रशिक्षकांचे विश्वचषकात स्वागत करण्यात येईल, अशी हमी दिली होती. असोसिएटेड प्रेसच्या वृत्तानुसार, खाजगी चर्चांबाबत बोलण्यासाठी नाव जाहीर न करण्याच्या अटीवर एका व्हाईट हाऊस अधिकाऱ्यानेही ट्रम्प यांनी इन्फांटिनो यांना इराणच्या सहभागाबाबत सकारात्मकता दर्शवल्याचं सांगितलं.

> **तर.. इरानलाआर्थिक दंड आकारला जाणार**
> जर इराणने स्पर्धेतून माघार घेतली, तर विश्वचषकाच्या नियमावलीतील कलम ६ नुसार त्यावर आर्थिक दंड आकारला जाऊ शकतो. तसेच रिक्त झालेल्या जागेसाठी कोणत्याही दुसऱ्या देशाला संधी देण्याचा अधिकार फिफाकडे असेल.

दरम्यान, गुरुवारी व्हाईट हाऊसने ट्रम्प यांनी ङ्गत्यांच्या स्वतःच्या जीवित आणि सुरक्षेच्या दृष्टीनेङ्घ असा उल्लेख नेमका कशासाठी केला होता, याबाबत स्पष्टीकरण दिलं नाही. २८ फेब्रुवारीपासून अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यांनंतर अमेरिकेत असताना इराणी संघाला कोणताही धोका निर्माण होऊ शकतो का, याबाबत त्यांनी इशारा दिला होता का, याबाबतही स्पष्टता करण्यात आली नाही. इराणचा संघ १५ जून रोजी कॅलिफोर्नियातील इंग्लवूड येथे न्यूझीलंडविरुद्ध सामना खेळणार आहे. त्यानंतर २१ जूनला बेल्जियमविरुद्ध सामना होणार असून, २६ जूनला सिएटल येथे इजिप्तविरुद्ध सामना खेळत ते गट टप्प्यातील आपला प्रवास पूर्ण करणार आहेत.


जून महिन्यापासून डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाच्या कठोर स्थलांतर धोरणाचा भाग म्हणून इराणवर अमेरिकेत प्रवेश करण्यास बंदी घालण्यात आली आहे. मात्र, या नियमांमधून खेळाडू आणि प्रशिक्षकांना सूट देण्यात आली असल्यामुळे इराणचा फुटबॉल संघ अमेरिकेत प्रवेश करू शकतो.

दरम्यान, इराणचे क्रीडामंत्री अहमद दोन्यामाली यांनी बुधवारी केलेल्या वक्तव्यामुळे आधुनिक काळातील फुटबॉल विश्वचषकातून एखादा संघ माघार घेण्याची शक्यता प्रथमच निर्माण झाली असल्याचं वृत्त 'रॉयटर्स'ने दिलं आहे.

२८ फेब्रुवारी रोजी अमेरिका आणि इस्रायलने केलेल्या हवाई हल्ल्यांमध्ये इराणचे सर्वोच्च नेते आयातोल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाला. त्यानंतर संपूर्ण प्रदेशात संघर्षाची परिस्थिती निर्माण झाली असून ती अजूनही शांत झालेली नाही. अशा परिस्थितीत इराणसाठी विश्वचषकात सहभागी होणं अशक्य असल्याचं दोन्यामाली यांनी स्पष्ट केलं. यजमान देशांपैकी एका देशाशी युद्ध सुरू असताना इराणने विश्वचषकात सहभागी होणं सुरुवातीपासूनच विसंगत वाटत होतं. तरीही मंगळवारीपर्यंत फिफा संघटना इराणचा संघ १५ जून रोजी लॉस एंजेलिसमध्ये न्यूझीलंडविरुद्ध होणाऱ्या पहिल्या गट सामन्यात उतरतील, अशी अपेक्षा व्यक्त करत होती.

## काव्या मारनने पाकिस्तानी खेळाडूवर केला पैशांचा वर्षाव, ऑक्शनमध्ये लावली तब्बल २.३४ कोटींची बोली

दिल्ली–क्रिकेट हा अनिश्चिततेचा खेळ आहे असं म्हटलं जातं. पण गेल्या काही वर्षात एक गोष्ट निश्चित होती ती म्हणजे जिथे भारतीय पैसे आहे तिथे पाकिस्तानी खेळाडू राहणार नाहीत. हा नियम आयपीएल, दक्षिण आफ्रिकेतील डअ२० लीग, युएई इत्यादी ठिकाणी पाहायला मिळाला. मात्र गुरुवारी लंडनमध्ये द हंड्रेड लीगमध्ये सनरायझर्स लीड्सने टाकलेल्या गुगलीने केवळ फलंदाजांनाच नव्हे तर क्रिकेटच्या राजकीय पंडितांनाही क्लीन बोल्ड केले. सनराइजर्स लीड्सने द हंड्रेडच्या आधी एक ऐतिहासिक ऑक्शनमध्ये पाकिस्तानी स्पिनर अबरार अहमदला ङ्घ१९०,००० म्हणजेच जवळपास २.३४ कोटी रुपयांना खरेदी करून सर्वांनाच आश्चर्यचकित केलं. सन टीवी नेटवर्क (सनराइजर्स हैदराबादचे मालक) ने पाकिस्तानच्या



गोलंदाजांना संघात घेऊन एक अघोषित भूमिकेला छेद दिला की जगभरातील लीगमध्ये भारतीय मालकांचे संघ हे त्यांच्या संघात पाकिस्तानी खेळाडूंना साइन करत नाहीत. काव्या मारनने लावली बोली : वर्षानुवर्षे आयपीएल फ्रँचायझी मालकांनी एक भिंत उभारली होती जिला तोडणं किंवा ओलांडणं हे कठीण वाटत होतं. नियम सोपा होता: संघ आमचा आहे, पैसा आमचा आहे, म्हणून खेळाडू देखील आमच्या पसंतीचे असतील असा अघोषित नियम होता. त्यामुळे संघाचे मालक भारतीय असतील तर त्या संघात पाकिस्तानी खेळाडूंना संधी मिळत नव्हती. मात्र काव्या मारनने गुरुवारी द हंड्रेड लीगच्या ऑक्शनमध्ये पाकिस्तानी खेळाडूवर फक्त बोलीच लावली नाही तर तब्बल २.३४ कोटी रक्कम खर्च करून त्याला संघात घेतलं.

## धोनी नाही तर या वर्ल्ड कप चॅम्पियनचे मी कधी तोंडही बघत नाही: गौतम गंभीर

**मी सचिनला टीम इंडियामधून काढले नाही..**

**नवी दिल्ली**–हेड कोच गौतम गंभीर याच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने टी–ट्वेंटी वर्ल्ड कपवर नाव कोरले आहे. वर्ल्ड कप जिंकल्यानंतर गौतम गंभीरचं कौतुक होताना दिसतंय. अशातच माजी चीफ सिलेक्टर संदीप पाटील यांनी सचिनच्या निवृत्तीवर आणि गौतम गंभीरवर मोठे वक्तव्य केले आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे माजी मुख्य निवडकर्ता संदीप पाटील यांनी त्यांच्या कार्यकाळातील काही खळबळजनक गौप्यस्फोट केले आहेत.



संदीप पाटील यांच्या ४ वर्षांच्या कार्यकाळात युवराज सिंग, गौतम गंभीर आणि साचिन तेंडुलकर यांसारख्या मोठ्या नावांना संघातून डच्चू देण्यात आला होता. विशेषत: सचिन तेंडुलकरच्या निवृत्तीबाबत त्यावेळी झालेली चर्चा आणि निवड समितीची भूमिका यावर पाटील यांनी आता सविस्तर भाष्य केलं आहे. सचिन तेंडुलकरला संघातून वगळलं नव्हतं किंवा त्याला निवृत्ती घेण्यासही सांगितलं नव्हतं, असंही पाटील यांनी स्पष्ट केलंय.''निवडकर्ते एखाद्या स्टार खेळाडूला संघातून ड्रॉप करू शकतात, पण त्याचं करिअर संपलं आहे असे सांगू शकत नाहीत,'' असं पाटील म्हणाले. जेव्हा त्यांनी सचिनला त्याच्या भविष्यातील प्लॅन्सबद्दल विचारलं, तेव्हा त्याने खेळ सुरू ठेवण्याची इच्छा व्यक्त केली होती आणि निवड समितीने त्याला होकार दिला होता; त्यानंतर सचिनने स्वत:हून फोन करून निवृत्तीचा निर्णय कळवला. नागपूरमधील त्या बैठकीनंतर जेव्हा सचिनच्या निवृत्तीच्या बातम्या बाहेर आल्या, तेव्हा संदीप पाटील यांच्यावर प्रचंड टीका झाली होती. एका बातमीचे हेडलाईन 'संदीप पाटील यांनी सचिनला बोल्ड केलं' असं होतं, ज्याची आठवण काढून पाटील आजही हसतात. चाहत्यांचा राग त्यांना समजतो कारण सचिन हा कोट्यवधी लोकांचे दैवत आहे, मात्र निवडकर्ते म्हणून कठोर निर्णय घेणं आवश्यक होते, असं त्यांनी नमूद केलं.

## अर्जुन आणि सानियाला दिल्या अमित शाह यांनी खास शुभेच्छा

मुंबई–केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी भारताचे माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांच्या कुटुंबाला विशेष शुभेच्छापत्र पाठवले आहे. सचिन तेंडुलकर यांचा मुलगा अर्जुन तेंडुलकर याच्या विवाहानिमित्त हे पत्र पाठवण्यात आले आहे.

६ मार्च २०२६ रोजी पाठवलेल्या या पत्रात अमित शाह यांनी अर्जुन तेंडुलकर आणि त्याची पत्नी सानिया यांना वैवाहिक जीवनासाठी मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत. प्रेम, विश्वास आणि आनंदाने परिपूर्ण असलेल्या या नव्या आयुष्याच्या प्रवासासाठी त्यांनी या दोघांना शुभाशिर्वाद दिले आहेत. या पत्रात भारतीय संस्कृतीत विवाह हा केवळ दोन व्यक्तींचा नव्हे तर दोन कुटुंबांचा पवित्र बंध असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. भगवान श्री गणेशाच्या कृपेने या दोघांना आयुष्यात आनंद, समृद्धी आणि यश मिळो, हीच प्रार्थना.

तसेच तेंडुलकर कुटुंबाच्या संस्कारांचे कौतुक करत अमित शाह यांनी संपूर्ण कुटुंबाला शुभेच्छा दिल्या आहेत. अमित शाह यांचे हे पत्र सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरत आहे.



# भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादवचे मुंबईत जंगी स्वागत

मुंबई : आयसीसी विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाला विक्रमी तिसर्यांदा जेतेपद मिळवून देणार्या सूर्यकुमार यादव याचे मुंबईत जंगी स्वागत करण्यात आले. अहमदाबाद येथील मैदानात न्यूझीलंडला पराभूत करत भारतीय संघाने यंदाच्या हंगाम गाजवत छोट्या फॉरमॅटमध्ये मोठा धमाका केला. पहिल्यांदाच टी–२० वर्ल्ड कप स्पर्धेत भारतीय संघाचे नेतृत्व करताना सूर्यानं कपिल पाजींसह एमएस धोनी आणि रोहित शर्मा या दिग्गजांच्या पंक्तीत स्थान मिळवले. सूर्या दादाच्या स्वागतासाठी त्याच्या देवनार येथील निवासी संकुलातील अलिशान घराच्या परिसरात चाहत्यांनी मोठी गर्दी केली होती. ढोल ताशाच्या गजरात वर्ल्ड चॅम्पियन कर्णधार सूर्यकुमार याचे स्वागत झाले.



पुष्पगुच्छ आणि शाल आणि श्रीफळ देऊन त्याचा सत्कार करण्यात आला. सोसायटीच्या वतीनं सूर्याचं औक्षणही करण्यात आलं. सोशल मीडियावर सूर्याच्या स्वागताच्या क्षणाचा व्हिडिओ व्हायरल होताना दिसत आहे. अहमदाबादच्या मैदानातील ऐतिहासिक कामगिरीनंतर मुंबईच्या विमानतळावर सूर्याची झलक पाहण्यासाठी देखील क्रिकेट चाहत्यांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी त्याला वर्ल्ड चॅम्पियन कॅप्टन झाल्यावर कसे वाटते? असा प्रश्न विचारण्यात आला होता. यावर खूप छान वाटतं आहे, असे उत्तर भारतीय कर्णधाराने दिले. सूर्यकुमार यादव हा भारतीय संघाला टी–२० वर्ल्ड कप जिंकून देणारा तिसरा कर्णधार आहे. २०२१ मध्ये त्याने वयाच्या ३० व्या वर्षी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. पण दमदार कामगिरीच्या जोरावर अवघ्या पाच वर्षात तो वर्ल्ड चॅम्पियन कॅप्टन झाला आहे.

याआधी त्याने सर्वोत्तम कॅचच्या जोरावर टीम इंडियाला ट्रॉफी जिंकून दिली होती. २०२४ मध्ये सूर्याच्या एका अफलातून कॅचवर फायनल मॅच फिरली. रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील टीम इंडियाने दक्षिण आफ्रिकेला पराभूत ट्रॉफी जिंकली होती. या हंगामानंतर रोहित शर्मानं टी–२० क्रिकेटमध्ये निवृत्ती घेतल्यावर सूर्या भारतीय संघाचा नवा कर्णधार झाला. द्विपक्षीय मालिकेत दबदबा कायम राखत त्याने टी–२० वर्ल्ड कप जेतेपदाचा बचाव करण्यातही यश मिळवले आहे.

> **वर्ल्ड कप स्पर्धेत सूर्याची यशस्वी कर्णधारी**
> सूर्यानं कपिल पाजींसह एमएस धोनी आणि रोहित शर्मा या दिग्गजांच्या पंक्तीत स्थान मिळवले. सूर्या दादाच्या स्वागतासाठी त्याच्या देवनार येथील निवासी संकुलातील अलिशान घराच्या परिसरात चाहत्यांनी मोठी गर्दी केली होती. ढोल ताशाच्या गजरात वर्ल्ड चॅम्पियन कर्णधार सूर्यकुमार याचे स्वागत झाले. पुष्पगुच्छ आणि शाल आणि श्रीफळ देऊन त्याचा सत्कार करण्यात आला. सोसायटीच्या वतीनं सूर्याचं औक्षणही करण्यात आलं. सोशल मीडियावर सूर्याच्या स्वागताच्या क्षणाचा व्हिडिओ व्हायरल होताना दिसत आहे.

## शासकीय योजनांच्या लाभासाठी दिव्यांग सहाय्यक पोर्टलवर नोंदणी करावी; केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळणार

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य दिव्यांग कल्याण विभागातंर्गत दिव्यांग बांधवांसाठी विविध योजना राबविण्यात येतात. यात दिव्यांगाची हेळसांड होवू नये व घरबसल्यास योजनेचा लाभ घेणे सोईचे होईल, यादृष्टीकोनातून मुंबई दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांच्या संकल्पनेतून राज्य शासनाच्यावतीने दिव्यांग सहाय्यक पोर्टल निर्मिती करण्यात आली आहे. या पोर्टलवर जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांनी ऑनलाईन नोंदणी करुन शासकीय योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन लातूर जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूलकुमार मीना यांनी केले आहे.

केंद्र व राज्य शासनामार्फत दिव्यांग बांधवांना सक्षम बनविण्यासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. या योजनेचा लाभ दिव्यांगांना सुलभ होण्याच्या दृष्टीने या पोर्टलची निर्मिती करण्यात आली आहे. दिव्यांग बांधवांच्या विविध योजना यात असून विविध विभागातील माहिती यात दर्शविण्यात आली आहे. एकाच छताखाली दिव्यांग बांधवांच्या विविध योजना यात समाविष्ट करण्यात आल्या आहेत, यात शासकीय योजनासह सेवा व लाभ यातून मिळणार आहेत. दिव्यांग विद्यार्थी शिष्यवृत्ती, साधने व उपकरणे, स्वंयरोजगारासाठी साधन सामुग्री, अर्थसहाय्य, गुणवत्ता पुरस्कार, सामाजिक सुरक्षा अंतर्गत विवाह प्रोत्साहन अनुदान, विविध शाळा व महाविद्यालयातील प्रवेश, रुग्णालयातील उपचार यासह अनेक योजनांचा या पोर्टलवर समावेश करण्यात आला आहे.

दिव्यांग बांधवांनी https://divyangsahayakportal.maharashtra.gov.in या संकेस्थळावर ऑनलाईन नोंदणी करतांना युआयडी क्रमांक टाकून नोंदणी करावी व विविध योजनांचा लाभ घ्यावा असे कळविले आहे.

## दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात गणित व विज्ञान विषयाच्या शिक्षकांसाठी एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन




**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात दि.१४ मार्च २०२६ रोजी विद्यार्थ्यांची विचार करण्याची क्षमता वाढविण्यासाठी फ्यूचर रेडी टिचर -२०२६ या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे.यामध्ये '' स्मार्ट टीचिंग आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स '' या विषयावर इयत्ता ०९ वी व १० वीच्या गणित व विज्ञान विषय शिकविणाऱ्या शिक्षकांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या कार्यशाळेचे उदघाटन दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये सकाळी ठीक १०:३० ते ११:३० या वेळेत होणार आहे. कार्यशाळेप्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद लातूर,शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड, महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, उपप्राचार्य प्रा. भाऊसाहेब सरवदे, सेल्फ फायनान्सचे प्राचार्य अनिलकुमार माळी, पर्यवेक्षिका डॉ. संध्या कोल्हे आणि पर्यवेक्षक डॉ. हेमंत वरुडकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. सदर कार्यशाळेत साधन व्यक्ती म्हणून पहिल्या सत्रात प्रकाश कमाले हे '' विज्ञान '', दुसऱ्या सत्रात विजयकुमार किलचे हे '' गणित '' आणि तिसऱ्या सत्रात गौरव बाहेती व सौ. जान्हवी बाहेती हे '' शिक्षणातील कृत्रिम बुद्धिमत्ता '' या विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेचा समारोप दुपारी ठीक ०४:०० वाजता होणार आहे. या कार्यशाळेत राज्यातील तसेच लातूर जिल्ह्यातील विविध शाळांतील इयत्ता ०९ वी व १० वी ला गणित व विज्ञान विषय शिकविणाऱ्या शिक्षकांनी जास्तीत-जास्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे व संयोजन समितीच्या वतीने करण्यात आलेले आहे.

## इराक किनाऱ्याजवळ अमेरिकेच्या तेल टँकरवर हल्ला; एका भारतीयाचा मृत्यू

**मुंबई/प्रतिनिधी :** इराण आणि अमेरिकेच्या युद्धाचा आज (गुरुवार १२ मार्च) तेरावा दिवस आहे. अशातच आता इराणने रात्री अमेरिकेच्या मालकीच्या सेफसी विष्णू या तेल टँकरवर हल्ला केला. या हल्ल्यात एका भारतीय व्यक्तीचा मृत्यू झाला आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, इराकच्या किनाऱ्याजवळ अमेरिकेच्या मालकीच्या 'सेफसी विष्णू' या तेलवाहू टँकरवर रात्री उशिरा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. प्राथमिक माहितीनुसार हा हल्ला इराणशी संबंधित स्फोटकांनी भरलेल्या बोटीने केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या हल्ल्यात जहाजावरील एका भारतीय खलाशाचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.

# रेल्वे पुलासह उर्वरित रस्त्यासाठी २०५ कोटीचा निधी मंजूर

### ➤ लातूर मुरुड येडशी रस्त्याचे संपूर्ण चौपदरीकरण होणार
### ➤ केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीनजी गडकरी यांचे आ. रमेशअप्पा कराड यांनी मानले आभार



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर मुरुड येडशी दरम्यानच्या रस्त्याचे एक बाजूचे काम प्रगतीपथावर असून केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीनजी गडकरी यांनी या रस्त्याच्या दुसऱ्या बाजूसह लातूर शहरानजीक रेल्वे उड्डाणपुलाच्या कामाला मंजुरी देऊन २०५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. नव्याने रस्त्याच्या उर्वरित कामाला मंजुरी मिळाल्याने लातूर ते येडशी पर्यंत संपूर्ण रस्त्याचे चौपदरीकरण होणार असल्याची माहिती लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांनी दिली.

लातूर येथून मुंबई पुण्याकडे जाणाऱ्या नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेल्या लातूर टेंभुर्णी या रस्त्याचे काम तातडीने करण्यात यावे यासाठी केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीनजी गडकरी यांच्याकडे भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला. केलेल्या पाठपुराव्यामुळे या रस्त्याचे काम केंद्रीय रस्ते व वाहतूक विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून करण्यात येत आहे. लातूर पासून सुरू झालेले रस्त्याचे काम एक बाजूने जवळपास पूर्णत्वाकडे आले असून त्यातील बोरगाव काळे ते जावळे फाट्या दरम्यानचे रस्त्याचे काम सध्या प्रगतीपथावर आहे.

रस्त्यावरून होणारी वाहतूक लक्षात घेता लातूर ते येडशी या रस्त्याचे चौपदरीकरण करणे अत्यंत गरजेचे असल्याने मागील काळात आ. रमेशआप्पा कराड यांनी केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांना प्रत्यक्ष भेटून रस्त्याचे काम चौपदरीकरण करावे अशी आग्रहाची मागणी केली होती.

केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांनी लातूर येडशी दरम्यानच्या रस्त्याची गरज लक्षात घेऊन ज्या ठिकाणी एक बाजूने काम झाले आहे अशा ठिकाणी दुसऱ्या बाजूचे जवळपास १६ किलोमीटर काम करण्यासाठी आणि लातूर शहरानजीक हरंगुळ परिसरातील रेल्वे मार्गावर दुसरा नव्याने उड्डाणपूल उभारणी करिता मान्यता देऊन २०५ कोटी रुपयाचा निधी चालू मार्च महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात मंजूर केला आहे.



केंद्रीय रस्ते व वाहतूक विभागाने नव्याने मंजूर केलेल्या २०५ कोटी रुपयांतून बोरगाव काळे ते मुरुड अकोला दरम्यान ११ किलोमीटर, येडशी ते जावळे फाटा २ किलोमीटर आणि येडशी गावाच्या बाहेरून रिंग रोड करिता २ किलोमीटर त्याचबरोबर हरंगुळ परिसरातील रेल्वे लाईनवर नवीन स्वतंत्र दुसरा उड्डाणपूल व पोच मार्ग करण्यात येणार आहे. नव्याने मंजूरी मिळालेल्या रस्त्याच्या ठिकठिकाणीच्या कामाकरिता जवळपास आठ हेक्टर जमीन भूसंपादन होणार असल्याची माहिती देऊन भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, नव्याने मंजूर झालेल्या कामाची लवकरच निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर लातूर ते येडशी हा संपूर्ण रस्ता चौपदरीकरणाने होईल. सदर कामासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांचे भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांनी आभार व्यक्त केले आहेत.

# महागाईचा भडका! लातूरमध्ये गॅस दरवाढीविरोधात काँग्रेसची 'सिलेंडर अंत्ययात्रा' आणि भर रस्त्यात पेटवली चूल




**लातूर/प्रतिनिधी :** केंद्र सरकारने घरगुती गॅस सिलेंडरच्या दरात केलेल्या भरमसाठ वाढीने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. या दरवाढीचा निषेध करण्यासाठी आज लातूर शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने शहरात अत्यंत आक्रमक आणि अनोखे आंदोलन करण्यात आले. काँग्रेस भवन ते महात्मा गांधी चौक या मार्गावर काँग्रेस कार्यकर्त्यांनी गॅस सिलेंडरची चक्क 'अंत्ययात्रा' काढून महात्मा गांधी यांच्या पुतळ्यासमोर केंद्र सरकारच्या धोरणांचा तीव्र निषेध नोंदवला.

**सिलेंडरची तिरडी आणि सरकारचा निषेध**

या आंदोलनाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे कार्यकर्त्यांनी गॅस सिलेंडरला फुलांचे हार घालून, त्याला बांबूच्या तिरडीवर बांधून त्याची अंत्ययात्रा काढली. महागाईने सामान्यांच्या स्वप्नांची राखरांगोळी केली असून, गॅस सिलेंडर आता सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेला आहे, अशा भावना आंदोलकांनी व्यक्त केल्या. 'भाजप सरकारचे करायचे काय, खाली डोकं वर पाय' परत या परत या गॅस दर परत , अमर रहे अमर रहे गॅस सिलेंडर अमर रहे, या अशा घोषणांनी लातूरचा मुख्य बाजारपेठ परिसर दणाणून गेला होता.

**रस्त्यावर पेटली चूल; गृहिणींचा संताप**

आंदोलनादरम्यान केवळ घोषणाबाजी न करता, महिला कार्यकर्त्यांनी भर रस्त्यात लाकडाची चूल पेटवून त्यावर स्वयंपाक करण्याचे प्रात्यक्षिक दाखवले. वाढत्या महागाईमुळे गॅस वापरणे अशक्य झाल्याने आता पुन्हा चुलीकडे वळण्याची वेळ आली आहे, हे यातून अधोरेखित करण्यात आले. एकदा गॅस देऊन फोटो काढणारे सरकार आता तोच गॅस भरण्यासाठी हजारो रुपये उकळत आहे, असा घणाघात यावेळी महिला पदाधिकाऱ्यांनी केला.

**जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांचा आक्रमक पवित्रा आणि पुढील इशारा**

या आंदोलनात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे यांनी यावेळी बोलताना सांगितले की, देशातील प्रत्येक नागरिक आज महागाईने होरपळून निघाला आहे. २१ व्या शतकात जर लोकांना गॅससाठी रांगा लावाव्या लागत असतील, तर हे सरकारचे अपयश आहे. युपीए सरकारच्या काळात ४०० रुपयांना मिळणारा सिलेंडर आज १२८० रुपयांच्या पुढे गेला आहे. सरकारने ही दरवाढ तातडीने मागे घ्यावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल.

**ॲड.किरण जाधव यांचा सरकारवर घणाघात**

लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड.किरण जाधव यांनी सरकारवर सडकून टीका केली. जाधव म्हणाले की, लाडकी बहीण' म्हणून योजना आणायची आणि दुसऱ्या बाजूला गॅसचे दर वाढवून त्यांच्या खिशातून पैसे काढून घ्यायचे, हे सरकारचे दुटप्पी धोरण आहे. काँग्रेसच्या काळात ४५० रुपयांना मिळणारा गॅस आज १२८० रुपयांवर गेला आहे. आज गॅस बुक केला तरी तो मिळेल की नाही, याची शाश्वती राहिलेली नाही. गॅसच्या या टंचाईमुळे आणि महागाईमुळे सर्वसामान्य जनता भयभीत झाली आहे. या महागाईने रोजगारची समस्या निर्माण झाली आहे सुशिक्षित बेरोजगार तरुणांना पकोडे विक्रीचा उपदेश देणाऱ्या सरकारने आता त्यांना गटारीतून गॅस निर्मितीचे प्रशिक्षण द्यावे अशी मागणी केली .

**हॉटेलमधील जेवणही महागले**

जाधव यांनी पुढे नमूद केले की, गॅस दरवाढीचा फटका केवळ घरगुती बजेटलाच नाही, तर हॉटेल व्यवसायालाही बसला आहे. कमर्शियल गॅसच्या वाढत्या दरामुळे हॉटेलमधील जेवण महाग झाले असून, त्याचा अंतिम बोजा सर्वसामान्य नागरिकांच्या खिशावरच पडत आहे. या महागाईच्या चक्रव्यूहात जनता अडकली असताना सरकार मात्र केवळ घोषणाबाजी करण्यात मग्न आहे.

यावेळी उपमहापौर ॲड. स्नेहल उटगे, महापालिकेतील काँग्रेसचे गटनेते विजयकुमार साबदे, सपना किसवे, तबस्सुम शेख, सचिन बंडापल्ले, फारुख शेख, अभिषेक पतंगे, मंगेश सोनकांबळे,पवन सोलंकर यांच्यासह अनेक नगरसेवक,महिला आघाडीच्या पदाधिकारी, विविध फ्रंटल सेलचे अध्यक्ष व शेकडो कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आजच्या या आंदोलनामुळे महागाईने त्रस्त असलेल्या नागरिकांनी देखील या आंदोलनाला उत्स्फूर्त पाठिंबा दर्शवल्याचे पाहायला मिळाले.

# लातूरच्या दोन्ही 'देशमुखां'ची सिनेसृष्टीत धमाकेदार एन्ट्री; 'राजा शिवाजी' आणि 'घबाड कुंड' चित्रपट लवकरच मोठ्या पडद्यावर




**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यासाठी यंदाचे वर्ष विशेष आनंदाचे ठरणार आहे. लातूरच्या दोन देशमुख कलाकारांचे मराठी चित्रपट एकापाठोपाठ एक मोठ्या पडद्यावर प्रदर्शित होणार असल्याने जिल्ह्यात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. लोकप्रिय अभिनेता रितेश विलासराव देशमुख आणि लातूरचा उदयोन्मुख अभिनेता अहेमद देशमुख उर्फ रॉकी देशमुख यांच्या चित्रपटांची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत.

लातूर जिल्ह्याने समाजकारण, राजकारण, वैद्यकीय क्षेत्र तसेच शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. 'लातूर पॅटर्न'मुळे शिक्षणाच्या क्षेत्रात जिल्ह्याने देशभरात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्याचबरोबर सिनेसृष्टीतही लातूरने आपले स्थान कायम ठेवले असून या जिल्ह्याने अनेक गुणी कलाकार दिले आहेत. यंदा उन्हाळ्याच्या सुट्टीत लातूरकरांना मोठ्या पडद्यावर दोन महत्त्वाचे मराठी चित्रपट पाहण्याची संधी मिळणार आहे. १ मे २०२६ रोजी (महाराष्ट्र दिनानिमित्त) अभिनेता व दिग्दर्शक रितेश देशमुख यांचा ऐतिहासिक मराठी चित्रपट 'राजा शिवाजी' प्रदर्शित होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्यगाथेवर आधारित हा भव्य ऐतिहासिक चित्रपट असल्याने प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता आहे. या चित्रपटात रितेश देशमुख छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमिकेत दिसणार आहेत. तसेच संजय दत्त, अभिषेक बच्चन, महेश मांजरेकर, फरदीन खान, जितेंद्र जोशी, भाग्यश्री, जिनिलीया देशमुख, सचिन खेडेकर आणि अमोल गुप्ते यांसारखी दमदार कलाकारांची फळी या चित्रपटात पाहायला मिळणार आहे.

त्यानंतर १९ जून रोजी 'घबाड कुंड' हा मराठी सस्पेन्स-थ्रिलर चित्रपट प्रदर्शित होणार आहे. हा चित्रपट मराठीतील पहिल्या 'युनिव्हर्स' संकल्पनेवर आधारित असल्याचे सांगितले जात आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन प्रीतम पाटील यांनी केले असून निर्माते रसीक कदम आहेत. या चित्रपटात देवदत्त नागे, कुशल बद्रिके, संदीप पाठक, शशांक शेंडे, प्राजक्ता हनमघर, स्मिता पायगुडे-अंजुटे, वैष्णवी कल्याणकर, आरोही भोईर, साहिल अनलदेवर आणि रॉकी देशमुख यांसारखे कलाकार प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. लातूर जिल्ह्यातील जळकोट तालुक्यातील उमरगा रेतू गावचे रहिवासी असलेले अहेमद देशमुख उर्फ रॉकी देशमुख यांनी मराठी चित्रपटसृष्टीत आपली वेगळी ओळख निर्माण करण्यास सुरुवात केली आहे. 'ढीशक्यांव', 'कर्मयोगी आबासाहेब' तसेच गेल्या वर्षी प्रदर्शित झालेल्या 'अल्याड पल्याड' या चित्रपटांमधून त्यांनी आपल्या अभिनयाची छाप पाडली आहे. आता 'घबाड कुंड' या चित्रपटात ते प्रमुख भूमिकेत झळकणार असल्याने प्रेक्षकांमध्ये उत्सुकता वाढली आहे.

लातूरच्या या दोन्ही कलाकारांचे चित्रपट सलग प्रदर्शित होत असल्याने जिल्ह्यातील चित्रपटप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. सोशल मीडियावरही या दोन्ही चित्रपटांना शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. त्यामुळे येत्या उन्हाळी सुट्टीत लातूरकर मोठ्या संख्येने चित्रपटगृहांकडे वळतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. म्हणूनच लातूरकरांनी आपल्या जिल्ह्याचा अभिमान असलेल्या या दोन्ही कलाकारांचे चित्रपट नक्कीच पाहावेत, असे आवाहनही अनेकांकडून केले जात आहे. एकीकडे ऐतिहासिक भव्यता असलेला 'राजा शिवाजी', तर दुसरीकडे रहस्यमय थरार घेऊन येणारा 'घबाड कुंड' असे दोन वेगवेगळ्या धाटणीचे चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस येत असल्याने मराठी चित्रपटप्रेमींना दुहेरी मेजवानी मिळणार आहे.

## महाराष्ट्राच्या जडणघडणीत यशवंतरावांचा सिंहाचा वाटा : डॉ. नागोराव कुंभार



**लातूर/प्रतिनिधी :** नव महाराष्ट्राचे शिल्पकार, महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या ११३ व्या जयंतीनिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र लातूर व यशवंतराव चव्हाण लोकविकास प्रतिष्ठान लातूरच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी यशवंतवांच्या जीवनावर प्रकाश टाकताना त्यांची महाराष्ट्राच्या जडणघडणीतील भूमिका सोदाहरण विषद केली.

यावेळी लोक्कास प्रतिष्ठानचे सचिव प्राचार्य डॉ. नागनाथ मोटे, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे लातूर विभागीय सदस्य विद्याधर कांदे-पाटील, सौ. सुनिता आरळीकर, विक्रम कदम, ॲड. वसंतराव उगिले, ॲड. सुधाकर आरसुडे. ॲड. शेखर विले, पंकज जैस्वाल, पृथ्वीराज गोरे, जितेंद्र तोडकर, प्रवीण सांळुके व मनपाच्या महिला कर्मचारी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे आभार विक्रम कदम यांनी मानले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# श्री मुक्तेश्वर विद्यालयात १४ व १५ मार्च रोजी लातूर ग्रंथोत्सव २०२५ चे आयोजन

## पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्या हस्ते होणार उद्घाटन

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग ग्रंथालय संचालनालय, मुंबई,लातूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय यांच्या वतीने शनिवार दिनांक १४ मार्च व रविवार दिनांक १५ मार्च २०२६ रोजी औसा येथील श्री मुक्तेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात, लातूर ग्रंथोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. दोन दिवसाच्या या ग्रंथोत्सवात ग्रंथदिंडी, ग्रंथ प्रदर्शन, ग्रंथ विक्री, विविध विषयांवरील परिसंवाद ,कवी संमेलन ,कथाकथन, उत्कृष्ट वाचकांचा सत्कार आणि समारोप असे उपक्रम राहणार असून या ग्रंथोत्सवाचे उद्घाटन जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर देशमुख यांनी दिली.

शनिवार दिनांक १४ मार्च रोजी सकाळी८.३० ते सकाळी १०.३० या वेळात नाथ मंदिर ते श्री मुक्तेश्वर विद्यालय दरम्यान ग्रंथदिंडी निघणार आहे .तिचे उद्घाटन पंढरपूर विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज यांच्या हस्ते होईल. यावेळी मुक्तेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवलिंग शांतिवीर औटी, जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे उपाध्यक्ष ग्रंथमित्र युवराज जाधव, मुक्तेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक



विद्यालयाचे प्राचार्य एस एम जलसगरे यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

सकाळी ११ ते दुपारी १ या दरम्यान उद्घाटन सत्र होणार असून पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते ग्रंथोत्सव २०२५ चे उद्घाटन होईल. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील हे राहणार आहेत. याप्रसंगी आमदार विक्रम काळे ,लातूरच्या महापौर जयश्री सोनकांबळे, खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर, खासदार डॉक्टर शिवाजी काळगे ,आमदार सतीश चव्हाण ,आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अमित देशमुख, आमदार संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार, आमदार रमेश कराड , औसाच्या नगराध्यक्षा परविन शेख ,जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे, राज्याचे प्रभारी ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, छत्रपती संभाजी नगर विभागाचे सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, इतिहास संशोधक प्राचार्य डॉक्टर सोमनाथ रोडे, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे कार्य उपाध्यक्ष ग्रंथमित्र राम मेखले,जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे अध्यक्ष ग्रंथ मित्र प्रभाकर कापसे ,मराठवाडा साहित्य परिषद लातूरचे अध्यक्ष योगराज माने यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

दुपारी २ ते ४ या वेळात सुमती जगताप यांच्या अध्यक्षतेखाली समाज विकासात महिलांचे योगदान या विषयावर परिसंवाद होणार आहे. यामध्ये डॉक्टर कुसुमताई मोरे, जिल्हा परिषद सदस्य आशाताई भिसे या प्रमुख वक्त्या राहणार आहेत.

दुपारी ४ ते सायंकाळी ६ या वेळात जेष्ठ कवयित्री वृषाली पाटील यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रितांचे कवी संमेलन होईल. याचे सूत्रसंचालन कवी संजय घाडगे व कवी दयानंद बिराजदार हे करणार आहेत. यामध्ये कवी शंकर झुलपे, रमेश चिल्ले भारत सातपुते, राजेसाहेब कदम, अजय पांडे, नरसिंग इंगळे, सतीश हाणेगावे, सुरेश गीर,रामदास कांबळे, प्रकाश घादगीने,संजय जमदाडे जाहिरोदिन शेख, जाहीरोद्दीन सय्यद,डॉक्टर दुष्यंत कठारे, प्रा

गोविंद जाधव, राजेंद्र माळी, रंजना गायकवाड, अरविंद मलवाडे, शैलजा कारंडे, रजनी गिरवलकर, जना घुले, वंदना केंद्रे, स्वाती जोशी, रुचा पत्की, नम्रता धडे, प्रणिता चाकूरकर, नयन राजमाने, उषा भोसले, विद्या बयास, डॉक्टर क्रांती मोरे, विमल मुढाळे, विजया भणगे, मंगल सास्तुरकर, तहसीन सय्यद, बालाजी मुंडे, राजेंद्र कांबळे, डॉक्टर निलेश नागरगोजे, देवदत्त मुंडे, एडवोकेट हाशम पटेल, सुरेखा ऊसतुर्गे,सविता धर्माधिकारी, सुलक्षणा सोनवणे, सुनिता मोरे, विश्वंभर इंगोले ,नामदेव कोद्रे, प्रदीप कांबळे, शिवाजी गायकवाड, रमेश हनुमंते, गोविंद गारकर, दिलीप लोभे, सत्तेशीला कलशेट्टी, अंगद भुरे, विशाल अंधारे,छगन घोडके, अनिल चवळे, डॉक्टर चंद्रशेखर मलकमपट्टे, दत्तप्रसाद झंवर, शालिनी निलंगेकर, जया निलंगेकर, कमलाकर सावंत भरत कांबळे, रमेश विवेकी, विश्वंभर वराट हे सहभागी होणार आहेत.

लातूर ग्रंथोत्सव २०२५ च्या दुसऱ्या रविवार दिनांक १५ मार्च २०२६ या दिवशी सकाळी १०.३० ते ११.३० या वेळात लेखिका सुनिता आरळीकर यांच्या अध्यक्षतेखाली ऐतिहासिक स्त्रिया: वारसा आणि कर्तृत्व या विषयावरील परिसंवाद होणार आहे, यात प्राचार्य मधुकर सलगरे डॉक्टर विवेक सौताडेकर, डॉक्टर अशोक नारनवरे हे विचार मांडणार आहेत.

सकाळी ११:३० ते दुपारी १ या वेळात ज्येष्ठ कथाकार जी. जी.कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली कथाकथनाचा कार्यक्रम होणार आहे.यामध्ये अंबादास केदार व सतीश सुरवसे हे कथा सादर करतील.

दुपारी २ते ४ या वेळात प्राचार्य डॉक्टर संजय गवई यांच्या अध्यक्षतेखाली कृत्रिम बुद्धिमत्ता :वाचन संस्कृतीस आव्हान या विषयावरील परिसंवादात डॉक्टर संभाजी पाटील व डॉक्टर रत्नाकर बेडगे हे विचार व्यक्त करणार आहेत.

दुपारी ४ ते सायंकाळी ५.३० या दरम्यान उत्कृष्ट वाचक सत्कार आणि लातूर ग्रंथोत्सव २०२५ चा समारोप जेष्ठ साहित्यिक विचारवंत डॉक्टर नागोराव कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मुक्तेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव रविशंकर मला चट्टे, औसाचे उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, लातूरचे शिक्षण उपसंचालक डॉक्टर दत्तात्रय मठपती, औसाचे तहसीलदार घनश्याम अडसूळ हे लाभणार आहेत..

दोन दिवस चालणाऱ्या या लातूर ग्रंथोत्सवात सकाळी १० ते रात्री८ या वेळात सर्वांसाठी ग्रंथ प्रदर्शन व विक्री खुली राहील, या ग्रंथोत्सवासाठी श्री मुक्तेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय औसा, श्री विकास वाचनालय औसा, कै रामदास नाईक सार्वजनिक वाचनालय औसा, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर वाचनालय औसा, शाह जमाल रसूल कादरी पब्लिक लायब्ररी औसा हे प्रयत्नशील आहेत, असे जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांनी सांगितले.

दरम्यान,लातूर जिल्ह्यातील ग्रंथालय चळवळीतील पदाधिकारी, ग्रंथालय कर्मचारी, वाचक, साहित्य प्रेमींनी या लातूर ग्रंथोत्सव २०२५ ला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन लातूर ग्रंथोत्सव समन्वय समितीचे अध्यक्ष सुनील हुसे, सदस्य डॉक्टर दत्तात्रय मठपती, तानाजी घोलप,ग्रंथ मित्र आत्माराम कांबळे, मसापचे लातूर जिल्हा अध्यक्ष योगीराज माने, ग्रंथमित्र प्रभाकर कापसे, सदस्य सचिव वंदना काटकर, तसेच पी.सी.पाटील, बाळ होळीकर, अनिल पाटील, धनंजय आप्पा कोपरे, कमलाकर सावंत, हावगीराव बेरकिले,डॉक्टर सुधीर गरड, श्रीधर स्वामी, शादुल शेख, सुधीर आचार्य, हिरालाल पाटील, सुधीर आचार्य, राजेंद्र कोरे यांनी केले आहे

## लातूरच्या मार्केटमध्ये दररोज ४० टन टरबूज, २० टन खरबुजाची आवक: सध्या फळांचे दर स्थिर

### आठवडाभरात १० टक्के दरात वाढीचा विक्रेत्यांकडून अंदाज व्यक्त



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरात उन्हाचा पारा ३८ अंशांवर पोहोचल्याने नागरिकांच्या आहारात रसाळ फळांचे प्रमाण वाढले आहे. वाढत्या उष्णतेसोबतच रमजान महिना सुरू असल्याने बाजारात गोड व थंड फळांची आवक मोठ्या प्रमाणावर होत आहे. सध्या लातूरच्या फ्रुट मार्केटमध्ये दररोज ४० टन टरबूज आणि २० टन खरबुजाची आवक होत असून, टरबूज खरेदीकडे ग्राहकांचा कल सर्वाधिक आहे.

बाजारपेठेत टरबूज, खरबूज, आंबा, सफरचंद आणि द्राक्षांचे स्टॉल ठिकठिकाणी सजले आहेत. घाऊक बाजारात टरबूज १५ ते १८ रुपये प्रति किलोने मिळत असले, तरी किरकोळ विक्रेते ३० ते ४० रुपयांपर्यंत त्याची विक्री करत आहेत. विशेष म्हणजे, गतवर्षीच्या तुलनेत सध्या फळांचे दर स्थिर असले, तरी वाढती मागणी आणि कडक उन्हामुळे आगामी काळात दरात १० ते १५ टक्क्यांनी वाढ होण्याचा अंदाज व्यापाऱ्यांनी वर्तवला आहे. उन्हापासून दिलासा मिळवण्यासाठी नागरिक थंड टरबूज आणि इतर रसाळ फळांना पसंती देत असल्याने बाजारपेठेत मोठी आर्थिक उलाढाल होताना दिसत आहे.

मार्च महिन्याच्या कडक उन्हात इस्लाम धर्मातील पवित्र रमजान महिन्याची सुरुवात झाली आहे. या महिन्यात इस्लाम धर्मातील लोक संपूर्ण महिना उपवास ठेवतात सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत काहीच खात नाहीत. सूर्यास्तानंतर उपवास सोडण्यासाठी गोड व रसाळ फळांचे सेवन केले जाते. परंतु यावर्षी पर्जन्यमान चांगले असल्यामुळे फळांची आवक चांगली झाली आहे.

लातूर शहरातील फ्रूट मार्केटमध्ये येणाऱ्या फळांची ही आवक मोठ्या प्रमाणात दिसून येते. फळांच्या किमती गतवर्षीच्या तुलनेत स्थिर असल्याने खरेदीस वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे. यावर्षी प्रजन्यमान चांगले असल्यामुळे फळांचा उतारा प्रमाणात झाला आहे. शहरातील फ्रुट मार्केटमध्ये येणाऱ्या फळांची आवक मोठ्या प्रमाणात असून गेल्या वर्षीप्रमाणेच यंदाचे दर स्थिर आहेत.

आवक चांगली झाल्याने भाव आटोक्यात आहेत. परंतू, पुढे पाडवा सणाच्या दरम्यान फळांचे भाव वाढू शकतील. याशिवाय विविध प्रकारचे आंबे यांची आवक पुढील काही दिवसांत वाढ होण्याची शक्यता आहे. अफरोज पठाण, फळ विक्रेते सध्या शहरात दररोज ४० टन टरबूज आणि २० टन खरबुजाची आवक होत असून, रमजानमुळे फळबाजार गजबजला आहे. घाऊक बाजारात टरबूज १५-१८ रुपये किलो असले, तरी किरकोळ विक्री ४० रुपयांपर्यंत आहे. उन्हामुळे दर १० टक्क्यांनी वाढण्याचा अंदाज आहे.

## बचत व काटकसरीच्या वृत्तीमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत महिलांचे योगदान महत्त्वाचे: डॉ. बाबासाहेब ठोंबरे




**लातूर/प्रतिनिधी :** जागतिक महिला दिनानिमित्त कृषी महाविद्यालय लातूर आणि एडीएम ग्रो यांच्या संयुक्त विद्यमाने कौशल्य विकास व लघु उद्योगातून महिला सक्षमीकरण या विषयावर युवती व महिला शेतकरी मेळावा उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना कृषी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेत महिलांच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले.

डॉ. ठोंबरे म्हणाले की, शेती आणि पूरक व्यवसायात महिलांचे मूल्यवर्धन मोलाचे असून, कष्ट करण्याची त्यांची वृत्ती पुरुषांपेक्षाही अधिक आहे. यावेळी उद्घाटक म्हणून राज्य महिला आयोगाच्या माजी सदस्या आशा भिसे उपस्थित होत्या. त्यांनी महिलांनी आपल्या कर्तृत्वाने सर्व क्षेत्रे काबीज केल्याचे सांगत प्रशिक्षणातून कौशल्य विकासावर भर दिला. कार्यक्रमात उत्कृष्ट भित्तीपत्रिका पुरस्काराबद्दल प्रतीक्षा खेडकर व स्वाती घोडके यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. विजय भामरे यांनी प्रास्ताविक केले, तर डॉ. ज्योती देशमुख यांनी सूत्रसंचालन व आभार मानले.

आचार्य पदवीच्या विद्यार्थिनींचा गौरव या मेळाव्यात केवळ मार्गदर्शनच नाही, तर प्रत्यक्ष काम करणाऱ्या महिलांचा सन्मानही करण्यात आला. श्रमप्रतिष्ठा जपणाऱ्या महिलांसह शैक्षणिक क्षेत्रात यश मिळवणाऱ्या आचार्य पदवीच्या विद्यार्थिनींचा गौरव झाला. अंजली रितू शर्मा, डॉ. आरती ढोबळे आणि डॉ. ज्योती देशमुख यांनी महिलांना विविध लघु उद्योगांबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.

महिलांनी वैयक्तिक काळजी घेणे आवश्यक आजची महिला प्रत्येक आघाड्यांवर यशस्वी होत आहे. एकीकडे चौफेर प्रगती साधत असताना महिलांनी वैयक्तिक काळजी घेणे आवश्यक आहे. स्वतःच्या आरोग्यासाठी शारीरिक, मानसिक व सामाजिक समतोल साधण्यासाठी महिलांनी दररोज योगसाधना केली जेणेकरून चांगले आरोग्य लाभेल.

## रेणा प्रकल्पाचे दरवाजे उघडले; २५० हेक्टर शेतीला संजीवनी



**रेणापूर/प्रतिनिधी :** उन्हामुळे पिके कोमेजू लागल्याने आणि पशुधनाच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होत असल्यामुळे रेणा मध्यम प्रकल्पातील पाणी सोडण्याची मागणी होत होती. अखेर गुरुवारी सकाळी ८.३० वाजता प्रकल्पातून पाणी सोडण्यात आले आहे. त्यामुळे २५० हेक्टरवरील पिकांना संजीवनी मिळत आहे.

आणि उन्हाळ्याचे चटके बसू लागल्यामुळे उन्हाळी पिकांसाठी पशुधनासाठीच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होऊ लागला आहे. त्यामुळे रेणापूर, घनसरगाव, जवळगा, खरोळा बॅरेजेस शेजारील शेतकरी व नदीपात्राच्या आजूबाजूस असलेल्या शेतकऱ्यांनी उन्हाळी पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी लघु पाटबंधारे विभागाकडे केली होती. यासंदर्भात प्रशासनाने विचार विनिमय करुन पाणी सोडण्याचा निर्णय घेतला. गुरुवारी सकाळी रेणा मध्यम

प्रकल्पातून रेणा नदीवरील घनसरगाव, रेणापूर, जवळगा, खरोळा या बॅरेजेसमध्ये उन्हाळी पिके व पशुधनासाठी पाणी सोडण्यात आले. हे पाणी गेट क्र. १ व गेट क्र. ६ अशा दोन दरवाजांद्वारे सोडण्यात येत आहे. दोन्ही दरवाजे १० सेंमीने उचलून १५ दलघमी पाणी सोडण्यात आले आहे. त्यामुळे जवळपास २५० हेक्टरवरील सिंचनास लाभ होणार आहे.

### चुली ..

गॅससिलेंडर्स गायब
कायसमस्या आली
प्रश्न गहन उद्भवला
आताकोण रे वाली

देशावरती आपत्ती
मदती आल्या चुली
आहो आम्ही सक्षम
भुकेवरी मारा फुली

चिंता ना करी मुळी
या अन्नपूर्णेच्यामुली
तोडगा त्वरित काढे
संकट आहे मामुली

जुने ते सोने म्हणता
गोष्ट ही खरी झाली
संस्कृतीचं सार्थश्रेष्ठ
पुनश्च प्रचिती आली

चुलीवरचास्वयंपाक
चविष्ट भोजन थाली
प्रगति मस्ती उतरली
अहंकार येता खाली

विस्तव वास्तव सांगे
अग्नीची कृपा भली
भुकाग्नीशांतवायला
चूल माऊली धावली

– हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६

## लांब पल्ल्यांच्या बस सोडण्याची मागणी

**शिरूर अनंतपाळ/प्रतिनिधी :** शिरूर अनंतपाळ तालुक्यातून पुणे,संभाजीनगर , परभणी, लातूर, मुंबई, नाशिक आदी ठिकाणी जाण्यासाठी सध्या थेट एसटी बस सेवा उपलब्ध नाही. त्यामुळे नागरिक, विद्यार्थी, नोकरी करणारे तसेच व्यापारी वर्गाला प्रवास करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. वरील मार्गावर लांब पल्ल्याच्या एसटी बस सेवा सुरू करावी, अशी मागणी विभाग नियंत्रकांकडे धनंजय देवंग्रे व संदीप धुमाळे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## पीव्हीआर चौकाची होणार वाहतूक कोंडीतून सुटका

### ३१ मार्चची डेडलाईन; मनपासह सर्व विभागांकडून प्रत्यक्ष पाहणी

**लातूर/प्रतिनिधी :** शहरातील वाहतूक कोंडी कायमस्वरूपी दूर करून वाहतुकीची समस्या सोडविण्यासाठी मनपासह सर्व विभाग कामाला लागले आहेत. त्या अनुषंगाने महापौर,उपमहापौर, पोलीस अधिक्षक, आयुक्त व प्रमुख अधिकाऱ्यांनी गुरुवारी पीव्हीआर चौकाची पाहणी केली.आवश्यक त्या उपाययोजना करून ३१ मार्चपर्यंत पीव्हीआर चौक वाहतूक कोंडीमुक्त करण्याची डेडलाईन यावेळी ठरविण्यात आली.

लातूर शहरात वाहतूक समस्या गंभीर होत असल्याने बुधवारी मनपा कार्यालयात विविध विभागांची बैठक आयोजित करण्यात आली होती.त्या बैठकीत ठरल्यानुसार गुरुवारी सकाळी महापौर जयश्री सोनकांबळे, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, मनपा आयुक्त श्रीमती मानसी ,उपमहापौर स्नेहल उटगे, सभागृह नेते विजयकुमार साबदे, विरोधी पक्षनेते देविदास काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी समिरसिंह साळवे, उपायुक्त पंजाबराब खानसोळे यांच्यासह इतर अधिकारी पीव्हीआर चौकात उपस्थित राहून तेथील समस्यांचा आढावा घेतला.



चौक परिसरात झालेली अनधिकृत अतिक्रमणे हटविणे,चौकात ५० मीटर अंतरापर्यंत नो पार्किंग झोन राबविणे,फ्री लेफ्ट टर्न संकल्पना अमलात आणणे, फेरीवाले व हातगाडे मुख्य रस्त्यावरून बाजूला करणे,सिग्नल यंत्रणा कार्यरत करणे या बाबी चौकातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी आवश्यक असल्याचे पाहणी दरम्यान लक्षात आले.चौकात झेब्रा क्रॉसिंगच्या खुणा पुन्हा करण्याचेही निर्देश देण्यात आले.

या सर्व उपाययोजनांची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले.पोलीस विभागानेही मनपाला सहकार्य करण्यास तत्पर असल्याचे सांगितले.

या सर्व बाबींचा विचार करता दिनांक ३१ मार्चपर्यंत पीव्हीआर चौकातील वाहतूक कोंडी दूर करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. पीव्हीआर चौकातील वाहतूक सुरळीत झाल्यानंतर शहरातील इतरही ठिकाणी याच पद्धतीने अंमलबजावणी केली जाणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

रोज वाचा
ऑनलाईन
लातूर समाचार
www.latursamachar.com

मध्य रेल्वे
सोलापूर विभाग
पुनर्बांधणीची कामे

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD), मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी रेल्वेच्या ई-खरेदी संकेतस्थळावर www.ireps.gov.in येथे ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करत आहेत: **निविदा क्रमांक:** SUR/TD/T/2026/04. **कामाचे नाव:** खालील कामांशी संबंधित विद्युत TRD विभागाची कामे: १) मोहोळ-वाडी विभागात ११ पुलांची पुनर्बांधणी (स्लॅब: ०६, RCC पाईप: ०३, कमानीचे पूल: ०२) आणि ०६ पुलांचा विस्तार (कमानी: ०५, बॉक्स: ०१). २) कुलाली-वाडी विभागात पूल क्रमांक ५५२/१, ५५२/२, ५५७/३, ५५७/४ आणि ५५७/५ च्या पोहोच मार्गांसाठी कमकुवत बाजूच्या उताराचे बळकटीकरण करणे; ज्यामध्ये मटो वॉलफ बांधकाम, मुरुम भरणे, दगडांचे आच्छादन करणे आणि २:१ उतारासह उप-तटबंदीचे सपाटीकरण करणे यांचा समावेश आहे (एकूण १००० * २ = २००० मी). ३) सोलापूर विभागातील कुर्डुवाडी-लातूर विभागात, बोगदा क्रमांक २ च्या आतील महत्त्वाच्या ठिकाणी आधारभूत संरचना आणि पोर्टल, शॉटक्रिटिंग, रॉक बोल्टिंग इत्यादींसारखी पूरक कामे उपलब्ध करून देणे. **अंदाजित खर्च:** ४५,१९,६६३/-. **निविदा सुरक्षा रक्कम:** ९०,४००/- **कामाचा कालावधी:** १२ महिने. **प्रस्तावाची वैधता:** ६० दिवस. **संकेतस्थळावर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ:** ०८.०४.२०२६ रोजी १५.०० वाजता. EXP-13

तिकिटांसाठी RailOne ॲप डाउनलोड करा

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
द.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क → Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६